नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १३२ * * अकोला * शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कार खड्डयात कोसळुन ५ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, रतलाम, दि. १४ :

रतलाममध्ये एका कारचे नियंत्रण सुटले आणि ती खड्डयात पडली. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, ज्यात एका १५ वर्षीय मुलाचा आणि एका ६० वर्षीय वृद्धाचा समावेश आहे. रतलाम जिल्ह्यातील रतलाम पोलिस स्टेशन हद्दीतील भीमपुरा गावाजवळ, माही नदी पुलाच्या अगदी आधी हा अपघात झाला. सकाळी ७:३० च्या सुमारास, नोंदणी क्रमांक MH०३ EL १३८८ असलेली कार रेलिंग तोडून दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर पडली. प्राथमिक माहितीनुसार, कारमध्ये मुंबई आणि अहमदाबाद येथील लोक होते. ते दिल्लीहून मुंबईला जात होते. सर्व मृतदेह रतलाम मेडिकल कॉलेजमध्ये पाठवण्यात आले आहेत.

# बिहारमध्ये एनडीएची सरशी

अग्राग्रलेख

खरीखरी..

## विजयाला नमस्कार !

बिहारमध्ये आज सर्वांचेच अंदाज चुकले. जे जिंकले त्यांना हे पचवणे जड झालेले आहे की, आपण जिंकलो आणि हरले त्यांना जिरवणे भारी झालेले आहे की आपण हरलो. बिहारच्या या विधानसभा निवडणूकीने खरोखरच इतिहास घडवला आहे. यात निवडणूक आयोगाची भूमिका किती मोठी आहे किंवा त्यांनी काय काय केले यावर आता कितीही आरोप किंवा आक्षेप घेतले. तरी आम्ही काल वर्तवल्याप्रमाणे, जो जीता वही सिकंदर होता है. त्यामुळेच या निकाला विरुद्ध हरलेल्या पक्षाला नक्कीच आश्चर्य वाटले असेल कारण या पक्षातील काही वाचाळ वीरांनी आपण हरलो तर बिहारमध्ये नेपाळ सारखे होईल अशा वल्गना केल्या होत्या. पण बिहार म्हणजे नेपाळ नाही कारण नेपाळ हे एक राष्ट्र आहे आणि बिहार देशाचा फक्त एक प्रांत आहे. बिहारच्या महिला मतदारांनी मोदी आणि नितीश यांच्या नावावर जबरदस्त मतदान केले असल्याचे दिसून येत आहे. माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी तर एका शब्दात जे सांगायचे ते आता सांगून टाकले आहे. बिहार सारख्या राज्यामध्ये महिलांच्या खात्यात १०,००० रुपयांची रक्कम येणे ही फार मोठी गोष्ट आहे, असे त्यांचे म्हणणे होते. तात्पर्य बिहार अतिशय गरीब राज्य आहे हे सिद्ध झाले. मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि आता बिहार या तीन राज्यांचा धडा पूर्ण देशभर राबवला गेला तर सत्तारूढ पक्षाची उंची इतकी मोठी होईल की तिथपर्यंत विरोधी पक्षांना पोहोचताही येणार नाही. मोदी आणि शहा यांना बिहारची निवडणूक जिंकणे अतिशय आवश्यक होते. ही बिहारची निवडणूक जिंकली नसती तर त्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असते. परंतु तेजस्वी यांचे तेज कमी पडले कारण अखेरपर्यंत मुख्यमंत्री पदासाठी तेजस्वी यांच्या नावाची घोषणा झाली नव्हती. त्यामुळेच तोपर्यंत तेजस्वी यांच्या प्रचाराला वेग आला नव्हता. त्यातच राहुल गांधींनी नेहमीप्रमाणे प्रचार केलाच नाही. आता निवडणुकीच्या निकालानंतर मोदी आणि शाह यांचे आसन अजून बळकट झालेले आहे. चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांना एनडीएत राहणे भाग आहे. मग आता प्रश्न असा आहे की, बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या नावाने मते मिळाली असली तरी मुख्यमंत्री पदावर भारतीय जनता पक्षालाही आपला दावा करता येऊ शकतो का. याचे उत्तर असे आहे की भारतीय जनता पक्षाने जास्त जागा जिंकल्यामुळे तो त्यांचा अधिकार होऊ शकतो. भाजप जवळ संपूर्ण बिहारमान्य नेता नाही हे खरे असले तरी, वरिष्ठांच्या चिठ्ठीद्वारे मुख्यमंत्री पदाचे नाव पक्के झाल्याचे आपण ऐकलेलेच आहे. आता नितीश कुमार आणि तेजस्वी दोघे एकत्र येऊनही सरकार बनवू शकत नाहीत कारण सरकार बनवणे हा आकड्यांचा खेळ आहे. हे सर्व विवरण विचारात घेतल्यावर एका गोष्टीचा नक्कीच विचार केला पाहिजे. ती गोष्ट म्हणजे भारतीय जनता पक्षाची विजयी होण्यासाठी असलेली प्रयत्नांची पराकाष्टा आणि हा मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. विरोधकांचे कोणतेही मुद्दे असो, कितीही कठीण परिस्थिती असो. प्रतिकूल वेळेतही मतदारांना आकर्षित करण्यासाठी जे जे करायचे ते बिनघोरपणे करून विरोधकांना घोर चिंतेत ठेवून शेवटच्या क्षणी आपटणे यामध्ये आता भारतीय जनता पक्ष तरबेज झाला आहे. आजच्या निकालाचे विश्लेषण केल्यावर एकच गोष्ट लक्षात राहण्यासारखी आहे. ती म्हणजे सगळ्या एक्झिट पोलवाल्यांची पोलम्पट्टी उघड झालेली आहे. हे जग उगवत्या सूर्याला नमस्कार करते. बिहारमध्ये विजयाचा सूर्य उगवला आहे, त्या विजयाला नमस्कार !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## महाआघाडीचे सपशेल पानिपत

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. १४ :

बिहार निवडणुकीत भाजपा-जदयूच्या आघाडीचा दणदणीत विजय झाला असून एनडीएला २०० हून अधिक जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रीय जनता दलाला मोठा झटका मिळाला असून काँग्रेसचेही पानिपत झाले आहे. लालू प्रसाद यादव यांचे ज्येष्ठ पुत्र आणि माजी उपमुख्यमंत्री तेजप्रताप यादव यांचाही दणदणीत पराभव झाला आहे. काही महिन्यांपूर्वी लालू प्रसाद यादव यांनी तेजप्रताप यांना पक्ष आणि कुटुंबातून बेदखल केले होते. त्यानंतर त्यांना राजकारणातही मोठा धक्का बसला आहे. तेजप्रताप यादव यांना पक्षातून बाहेर काढल्यानंतर त्यांनी जनशक्ती जनता दल या पक्षाची स्थापना केली होती. ते स्वतः महुआ विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीला उभे राहिले होते. मात्र या मतदारसंघात त्यांना पराभवाचे तोंड पाहावे लागले आहे.

महुआ विधानसभा मतदारसंघात लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास) उमेदवार संजय कुमार सिंह यांचा विजय झाला आहे. संजय कुमार सिंह यांनी ८७,६४१ मते मिळवली आहेत. तर दुसऱ्या स्थानावर असलेल्या राष्ट्रीय जनता दलाचे मुकेश कुमार रौशन यांना ४२,६४४ मते मिळाली आहेत. तर तेजप्रताप यादव यांना तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले आहे. त्यांना ३५,७०३ मते मिळाली आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, जर आरजेडीने या जागेवर उमेदवार दिला नसता तर कदाचित तर लोजपचे उमेदवार संजय कुमार सिंह आणि तेजप्रताप यादव यांच्यात कडवी टक्कर पाहायला मिळाली असती. मात्र तेजस्वी यादव यांनी मुकेश कुमार यांना तिकीट दिल्यामुळे मतविभाजनाचा फटका बसून तेजप्रताप यांचा पराभव झाला. एनडीएने यापैकी १२५ जागा जिंकल्या आहेत. महाआघाडीने १७ जागा जिंकल्या आहेत, तर ओवेसींच्या पक्ष एआयएमआयएमने पाच जागा जिंकल्या आहेत. एनडीएने जिल्ह्यातील ७ पैकी ६ विधानसभा जागा जिंकल्या. सीपीआय (एमएल)चे डॉ. अरुण कुमार कुशवाह यांनी कराकटमध्ये आपला विजय कायम ठेवला. २०२० च्या निवडणुकीत रोहतास जिल्ह्यात एनडीएचा पूर्णपणे सफाया झाला होता.





### कैमूरमध्ये मतमोजणी केंद्राबाहेर दगडफेक

कैमूरमधील मतदान मोजणी केंद्राबाहेर झालेल्या दगडफेकीत दोन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. रामगड विधानसभा मतदारसंघात गेल्या दीड तासापासून मतमोजणी थांबवण्यात आली आहे. बसप नेते सतीश यादव यांनी मतमोजणीत अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे.

* भाजप - ९४ जागांवर आघाडीवर
* जेडीयू - ८५ जागांवर आघाडीवर
* राजद - २९ जागांवर आघाडीवर
* लोजपा (आर) - २० जागांवर आघाडीवर
* काँग्रेस - ६ जागांवर आघाडीवर
* एआयएमआयएम - ५ जागांवर आघाडीवर
* एचएएम - ४ जागांवर आघाडीवर
* सीपीआयएमएल - ४ जागांवर आघाडीवर
* आरएलएम - ४ जागांवर आघाडीवर
* सीपीआयएम - १ जागेवर आघाडीवर
* बसपा - १ जागेवर आघाडीवर

## बिहार निवडणुकीमुळे निवडणूक आयोगावरील जनतेचा विश्वास अधिक मजबूत झाला : मोदी

बिहार निवडणुकीच्या प्रचारावेळी विरोधकांकडून सातत्यानं निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर शंका उपस्थित करण्यात येत होती, विरोधकांकडून निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करण्यात आले, दरम्यान आज बिहार निवडणुकीचा निकाल लागला आहे, बिहारमध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळालं आहे, त्यानंतर आता जनतेशी संवाद साधताना या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. बिहार निवडणुकीमुळे जनतेचा निवडणूक आयोगावरील विश्वास आणखी मजबूत झाल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. गेल्या काही वर्षांपासून सातत्याने प्रचंड मतदान होतंय. वंचित आणि शोषितांनी अधिक मतदान करणं हे निवडणूक आयोगाचं मोठं यश आहे, असंही यावेळी मोदी यांनी म्हटलं आहे.

## दिल्लीत बिहार निवडणूक विजयाचा जल्लोष

पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतील भाजप मुख्यालयात पोहोचले आहेत. त्यांनी मफलर हलवून कार्यकर्त्यांचे स्वागत केले. यावेळी सर्व कार्यकर्त्यांनीही मफलर हलवले.

बिहारमध्ये एनडीए सरकार स्थापन झाले आहे. युतीने २४३ पैकी २०२ जागा जिंकल्या, जो एक विक्रम आहे. महाआघाडीला फक्त ३४ जागा मिळाल्या. बिहारमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी १२२ जागा आवश्यक आहेत. एनडीएमध्ये, भाजप आणि जेडीयूने प्रत्येकी १०१ जागा लढवल्या. इतर मित्रपक्ष, एलजेपीला २९ जागा आणि एचएएम आणि आरएलएमला प्रत्येकी सहा जागा देण्यात आल्या. भाजपने ९१ जागा जिंकल्या. जेडीयूने ८३, एलजेपीने १९ आणि एचएएम आणि आरएलएमने मिळून नऊ जागा जिंकल्या.

एनडीएने राज्यात सर्वांगीण विकास घडवून आणला आहे. जनतेने आम्हाला प्रचंड बहुमत दिले आहे, आमचा ट्रॅक रेकॉर्ड आणि राज्याला नवीन उंचीवर नेण्याचे आमचे स्वप्न ओळखून. या शानदार विजयाबद्दल मी मुख्यमंत्री नितीश कुमार आणि आमचे एनडीए सहयोगी चिराग पासवान, जितन राम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांचे मनापासून अभिनंदन करतो.

या वर्षी ८ फेब्रुवारी रोजी दिल्ली विधानसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी पक्षाच्या मुख्यालयाला भेट दिली. त्यापूर्वी, हरियाणा विधानसभा निवडणूक, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आणि लोकसभा निवडणूक जिंकल्यानंतर मोदींनी भाजप कार्यालयाला भेट दिली होती.

## बिहारचा निकाल काँग्रेसच्या विषारी प्रचाराला जनतेचे उत्तर : मुख्यमंत्री

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :



बिहारच्या निवडणुकीत भाजप व एनडीए आघाडीवर असून जवळपास विजय हा निश्चितच झाल्याचे दिसत आहे. यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी देशात जो विषारी प्रचार चालवला आहे, त्याला जनतेने उत्तर दिल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. देवेंद्र फडणवीस हे राजधानी दिल्ली येथे असून पत्रकारांशी संवाद साधताना बिहार निवडणुकीवर प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाजप आणि एनडीए या सर्व घटक पक्षांच्या बिहार युनिटचे मी अभिनंदन करतो आणि बिहारच्या जनतेचे आभार मानतो. त्यांनी मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन, नितीश कुमार यांच्या सुशासनावर विश्वास ठेऊन आणि आमच्या घटक पक्षाला त्या ठिकाणी एनडीएच्या माध्यमातून प्रचंड मोठे बहुमत दिले आहे. २०१० चा सुद्धा रेकॉर्ड तुटू शकेल इतके बहुमत मिळाले आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, दुसरे महत्त्वाचे असे आहे की या विजयानंतर खऱ्या अर्थाने काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी देशात जो विषारी प्रचार चालवला आहे, त्याला जनतेने उत्तर दिले आहे.

## सुरक्षा दलांनी काश्मीरमध्ये दहशतवादी नबीचे घर उडवले

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४

दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात, सुरक्षा दलांनी गुरुवारी रात्री पुलवामा येथील दहशतवादी डॉ. उमर नबीचे घर आयईडी स्फोटाने उडवून दिले. गुरुवारी डीएनए मॅचिंगमध्ये स्फोट झालेली गाडी डॉ. उमर चालवत असल्याचे स्पष्ट झाले.

गुरुवारी, गुप्तचर संस्थांनी उघड केले की आतापर्यंत अटक केलेल्या आठ दहशतवाद्यांनी सांगितले होते की त्यांचा बाबरी मशीद पाडल्याचा बदला घेण्यासाठी ६ डिसेंबर रोजी दिल्लीसह देशभरातील विविध ठिकाणी बॉम्बस्फोट करण्याचा हेतू होता. या उद्देशाने त्यांनी ३२ कारची व्यवस्था केली होती. या कार बॉम्ब आणि स्फोटकांनी भरून स्फोट करायच्या होत्या.

आय२०, इकोस्पोर्ट आणि ब्रेझा कार या कटाचा भाग होत्या. १० नोव्हेंबर रोजी दिल्ली बॉम्बस्फोटात आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला आहे, तर २० जण जखमी झाले आहेत, त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

## एकाच कुटुंबातील पाच जण मृतावस्थेत आढळले

■ वृत्तसंस्था, श्रावस्ती, दि. १४

सकाळी बराच वेळ दरवाजा न उघडल्याने नातेवाईकांना संशय आला. त्यांनी खिडकीतून पाहिले असता आत भीषण दृश्य दिसले. घरातील सर्व सदस्य निष्प्राण अवस्थेत होते. मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. कोणतेही बाह्य जखमेचे चिन्ह किंवा मोठा गोंधळ घरात दिसून आला नाही, त्यामुळे घटनेभोवती संशयाचे धुके आणखी दाटले आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिसराला सुरक्षा कवच देत फॉरेन्सिक तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. त्यांनी खोलीची तळमळून तपासणी सुरू केली आहे. प्राथमिक चौकशीतही कुटुंबातील इतर सदस्यांकडे काही ठोस माहिती नाही. दरम्यान, कुटुंबातील नफीस नावाच्या युवकाबाबतही वेगळी माहिती पुढे आली आहे.

## 32 गाड्या हल्ल्यासाठी तयार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४

दिल्लीतील लाल किल्ला स्फोटांच्या तपासात दहशतवाद्यांनी आखलेली भयंकर योजना उघड झाली आहे. आतापर्यंत फक्त चार गाड्या व्हाईट कॉलर दहशतवाद प्रकरणाशी जोडल्या गेल्या होत्या, मात्र आता समोर आले आहे की जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांनी एकूण ३२ गाड्या तयार केल्या होत्या. या गाड्या ६ डिसेंबर रोजी अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्याच्या ३३ व्या वर्धापन दिनानिमित्त हल्ल्यासाठी वापरण्याचा कट रचला होता.

तपासात समोर आले आहे की या गाड्या स्फोटके आणि बॉम्ब वाहून नेण्यासाठी वापरण्यात येत होत्या. सोमवारी लाल किल्ल्याजवळ घडलेल्या स्फोटात वापरलेली आय२० कार यामध्ये समाविष्ट होती. तसेच, मारुती सुझुकी ब्रेझा, मारुती स्विफ्ट डिझायर आणि फोर्ड इकोस्पोर्ट या गाड्या देखील पोलिसांनी जप्त केल्या आहेत. हल्ल्यांसाठी निवडलेल्या ठिकाणांपैकी सहा ठिकाणे दिल्लीमध्ये होती. जप्त झालेल्या गाड्या जुनी आणि अनेक हातांमधून गेल्यामुळे पोलिसांसाठी दहशतवाद्यांपर्यंत पोहोचणे कठीण झाले होते.

विशेष म्हणजे, चौथी जप्त गाडी, मारुती सुझुकी ब्रेझा फरिदाबादमधील अल-फलाह स्कूल ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरमधून जप्त करण्यात आली, जी "दहशतवाद विद्यापीठ" म्हणून ओळखली जाते. बुधवारी संध्याकाळी फरिदाबादमधून एक फोर्ड इकोस्पोर्टदेखील जप्त करण्यात आली होती.

याआधी सोमवारी मारुती स्विफ्ट डिझायर जप्त करण्यात आली होती, ज्यामध्ये एक असॉल्ट रायफल आणि दारूगोळा सापडला होता. या प्रकरणामुळे दिल्लीतील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, दहशतवाद्यांच्या पुढील योजना तपासण्याचे काम सुरू आहे.



## बिहारमध्ये महाराष्ट्राचे फंडे वापरले गेले : बाळासाहेब थोरात



**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी एनडीएच्या बिहारमधील विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. बिहारमध्ये महाराष्ट्रात वापरण्यात आलेले फंडेच वापरण्यात आले. यामुळे तेथील निवडणूक प्रक्रिया निकोप होती का? हा प्रश्न उपस्थित होत आहे, असे ते म्हणालेत. बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी एनडीए विजयाच्या दिशेने वाटचाल करत आहे. या निकालाचे संपूर्ण देशात पडसाद उमटत आहेत. सत्ताधारी पक्ष विशेषतः भाजपने मतचोरीच्या मुद्यावरून काँग्रेससह संपूर्ण विरोधकांवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी एनडीएच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले, महाराष्ट्रातील फंडे बिहारमध्ये वापरले गेले. त्यामुळे लोकशाहीसाठी अशी निवडणूक प्रक्रिया खरेच योग्य आहे का? याचा विचार जनतेने केला पाहिजे.

# शिवसेना ठाकरे गट आणि भाजपमध्ये राडा

### अनिल परबांचा आक्रमक पवित्रा, हॉटेल ताज लँडच्या बाहेर शिवसैनिकांचा गोंधळ

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

शिवसेना ठाकरे गट आणि भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये मुंबई येथील हॉटेल ताज लँडच्या बाहेर राडा झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी ठाकरे गटाचे आमदार व नेते अनिल परब देखील आक्रमक भूमिकेत पाहायला मिळाले. शिवसेना ठाकरे गटाच्या भारतीय कामगार सेनेच्या कामगारांची फसवणूक करत भाजप प्रणीत संघटनांमध्ये घेत असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला. त्यानंतर शिवसैनिक हॉटेलच्या बाहेर जमले असता गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले.



अखिल भारतीय कर्मचारी संघ ही भाजप प्रणीत संघटना आहे, तर भारतीय कामगार सेना ही शिवसेनेची संघटना आहे. या दोन्ही संघटनांमध्ये वाद झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते हॉटेल ताज येथे दाखल झाले होते. यावेळी त्यांच्यासोबत अनिल परब देखील उपस्थित होते. ताज लँड हॉटेलमध्ये भाजपच्या प्रतिनिधींना जाब विचारण्यासाठी अनिल परब त्या ठिकाणी आले असता त्यांना पोलिसांनी अडवले. त्यानंतर परब यांचा रुद्रावतार पाहायला मिळाला.

कोणत्याही परिस्थितीत मी माझ्या कार्यकर्त्यांना अडवू शकत नाही, असे म्हणत अनिल परब यांनी पोलिसांनाच जाब विचारला. यामुळे येथे काही वेळासाठी गोंधळ निर्माण झाला होता. यावेळी भाजप नेत्यांशी चर्चा करण्यासाठी फक्त अनिल परब आणि इतर काही लोकांनीच जावे असे पोलिसांनी सांगितले. त्याला अनिल परब यांनी विरोध केला. माझ्यासोबत किमान 25 लोक मी आतमध्ये घेऊन जाणार. सत्तेत आहेत म्हणून त्यांना इतका माज आलाय का? असा संतप्त सवाल अनिल परब यांनी उपस्थित केला.

भारतीय कामगार सेनेच्या कार्यकर्त्यांना फसवून भाजपच्या अखिल भारतीय कर्मचारी संघात घेतले जात असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला आहे. कामगारांना फसवून त्यांच्या सह्या घेण्यात आल्याचा आरोप अनिल परब यांनी केला. भाजपकडून हॉटेलमध्ये चुकीच्या पद्धतीने कामगार संघटना स्थापन करण्यात आली आहे, त्यात शिवसेनेच्या कामगार संघटनेच्या कामगारांच्या सह्या फसवून घेतल्याचा दावा परब यांनी केला.

### बिहारमध्ये पराभव, महाराष्ट्रात भूकंप!

# काँग्रेसला मोठा झटका

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल हाती आला असून, महाआघाडीला मोठा पराभव झेलावा लागला आहे. एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले असून, आतापर्यंत मिळालेल्या निकालानुसार भाजप बिहारमधील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपचे उमेदवार तब्बल 96 जागांवर आघाडीवर आहेत, तर जेडीयूला देखील मोठं यश मिळालं असून ती 84 जागांवर आघाडीवर आहे. महाआघाडीच्या घटकपक्षांमध्ये काँग्रेसची अवस्था बिकट आहे; काँग्रेस फक्त दोन जागांवर आघाडीवर आहे. बिहारमधील या पराभवानंतर आता महाराष्ट्रातही काँग्रेसला मोठा झटका बसला आहे, बड्या नेत्याने पक्षाची साथ सोडली आहे.

ठाणे जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरगे यांनी तडकाफडकी काँग्रेसमधून राजीनामा दिला आहे. दयानंद चोरगे हे मागील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे भिवंडीतील उमेदवार होते. आपल्या पत्रात त्यांनी वैयक्तिक कारणांचा उल्लेख केला असून, तरीही अनेक दिवसांपासून पक्षावर नाराज असल्याची माहिती आहे. त्यांनी अनेक निवडणुकांमध्ये डावलं गेल्याची खंत व्यक्त केली होती. बिहारच्या निकालानंतर दयानंद चोरगे यांनी पक्षाचा आणि जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला, ऐन स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोडावर हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे.

बिहार निवडणुकीत महाआघाडी फक्त 29 जागांवर आघाडीवर राहिली, तर आरजेडी या घटकपक्षाला 25 जागांवर आघाडी मिळाली. काँग्रेस फक्त दोन जागांवर आघाडीवर आहे, त्यामुळे काँग्रेसमुळेच आरजेडीला अपेक्षित यश मिळाले नाही, अशी चर्चा सुरु झाली आहे. या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून जेडीयू दुसऱ्या क्रमांकावर आहे. जेडीयूपेक्षा भाजपच्या जागा अधिक असल्यामुळे बिहारमध्ये मुख्यमंत्री कोण होणार, याबाबत राजकीय उत्सुकता निर्माण झाली आहे.

## बिहार निवडणुकीने मतमोजणीत घोळ होतो यावर शिक्कामोर्तब



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालामुळे मतमोजणीत घोळ होत असल्यावर शिक्कामोर्तब झाल्याचा दावा केला आहे. सरकारचे बुजगावणे झालेली यंत्रणा व निवडणूक आयोग यामुळे लोकशाही व पयार्याने आरक्षण व संविधान धोक्यात आले आहे, असे ते म्हणालेत. बिहार विधानसभा निवडणुकीत राजद व काँग्रेसच्या महाआघाडीचा पार धुव्वा उडाला आहे. तिथे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकार पुन्हा एकदा सत्तेत येण्याची शक्यता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी मतमोजणीत घोळ झाल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, हरियाणा, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीकडे जनतेचा कौल होता. हे चित्र पोस्टल मतदानात देखील स्पष्ट झाले होते. एश्ट व्होटिंगदरम्यान पहिला एक तास हा कल पोस्टलप्रमाणेच राहिला. परंतु पुढच्या एक दीड तासात सर्व चित्र पालटले. भाजपा आश्चर्यकारक रित्या पुढे गेली आणि धक्कादायक निकाल समोर आला. आज सेम-टू-सेम याच पद्धतीचे चित्र बिहार निवडणुकीचे निकाल येताना दिसत आहे. येणाऱ्या निकालाने मतदान मोजणीत घोळ होतो यावर शिक्कामोर्तब झालं आहे.

## भाजपचा छुपा अजेंडा नितीशकुमारांना दूर करण्याचा : हर्षवर्धन सपकाळ

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**



बिहारमध्ये काही दिवस भाजपवाले नितीशकुमार यांनाच मुख्यमंत्री ठेवतील त्यानंतर मात्र भाजपचा मुख्यमंत्री होईल. मित्र पक्षांना संपवणे हा त्यांचा अजेंडा आहे. नितीशकुमार यांना ते सोडतील असे मला वाटत नाही. नितीश कुमारांसोबत बिहारमधील मागासवर्ग आणि महिलांची ताकद आहे. त्यामुळे तिथे सत्ता बदल झाला नाही. त्यांची तब्येत बरी नाही म्हणून त्यांना भाजप टकमक टोकाकडे घेऊन जाईल. लगेच नितीशकुमारांना दूर करणे भाजपला परवडणारे नाही पण त्यांना दूर करणे हाच भाजपचा छूपा अजेंडा आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, आज पराभव झाल्यानंतर आमच्या मित्रपक्षांच्या नेत्याने आमच्यावर टीका करणे हे घाईघाईने आहे.बिहारमध्ये काँग्रेस कमी जागेवर लढली हे देखील खरे आहे. राहुल गांधी तिथले सर्वात मोठे प्रचारक होते. या निकालाकडे महाराष्ट्राच्या किंवा बिहारच्या चश्मा तून न बघता देशाच्या लोकशाहीवर भाजप नावाचे जे संकट आले आहे, विरोधी पक्ष या नात्याने त्याकडे पाहिले पाहिजे.बिहारच्या संदभार्ने आज बोलणं गरजेचे नाही. अंबादास दानवे यांना कदाचित बिहारमधील माहिती नसावी म्हणून ते घाईघाईने काही तरी बोलत आहेत. बिहारमध्ये ठरलेल्या तारखेवर मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर झाला आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, बिहारच्या निकालाच्या संदभार्ने महाराष्ट्रात चूक झाली असे अंबादास दानवे यांचे वक्तव्य योग्य नाही या निकाला धरुण महाराष्ट्रावर बोलणं अयोग्य बिहारमध्ये ज्या गोष्टी जशा ठरल्या होत्या त्या तशाच केल्या गेल्या.

### भारतातील सर्वात मोठा कम्युनिटी लीड बिझनेस एक्स्पो

# एमईए आंतरराष्ट्रीय बिझनेस एक्स्पो पुण्यात आयोजित

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १४ :**

पुण्यात 27, 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च 2026 रोजी एमईए आंतरराष्ट्रीय बिझनेस एक्स्पो 2026 चे आयोजन करण्यात येणार आहे. कृषी मैदानावर होणा?या या एक्स्पोची घोषणा मराठा उद्योजक संघटना (एमईए) च्या वतीने कार्यकारी अध्यक्ष विक्रम गायकवाड आणि क्रेडाई राष्ट्रीयचे माजी अध्यक्ष सतीश मगर यांनी पत्रकार परिषदेत केली. एकतेपासून समृद्धीकडे या संकल्पनेवर आधारित हा भारतातील सर्वात मोठा कम्युनिटी लीड बिझनेस एक्स्पो असेल.

मराठा समाजात उद्योजकता वाढवणे आणि तरुणांना उद्योग क्षेत्रातील सखोल ज्ञान देणे हा एमईएचा गेल्या 14 वर्षांपासूनचा उद्देश आहे. याच ध्येयाचा भाग म्हणून हे आंतरराष्ट्रीय एक्स्पो आयोजित केले जात आहे.




परदेशातील मराठा उद्योजक, व्यावसायिक आणि नेते यांना एकत्र आणण्याचा यशस्वी प्रयत्न यातून होईल, असे गायकवाड यांनी सांगितले.या एक्स्पोमध्ये बांधकाम, उत्पादन, आयटी, एफएमसीजी, कृषी-तंत्रज्ञान, जीवनशैली, शिक्षण, आदरातिथ्य, सेवा, आयात-निर्यात, ऑटोमोबाईल, आरोग्य, बँकिंग-वित्त अशा विविध क्षेत्रांचा समावेश असेल. 500 हून अधिक स्टॉल्स, आंतरराष्ट्रीय व्यापारी संस्था, सरकारी प्रतिनिधी, धोरणकर्ते आणि तज्ज्ञ यांची उपस्थिती हे या एक्स्पोचे वैशिष्ट्य असेल.

हे व्यासपीठ उद्योजकांना व्यवसायवृद्धी, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी संपर्क, ब्रँड जागतिकीकरण, नव्या बाजारपेठा शोधणे आणि तज्ज्ञांचे ज्ञान मिळवणे यांसारख्या अनेक संधी उपलब्ध करून देईल. एमईएचे माजी अध्यक्ष अरुण निम्हण, सचिव राजेश कु-हाडे, सई बहिरट पाटील, नितीन भोसले, सागर तुपे आदी यावेळी उपस्थित होते.

गायकवाड यांनी सांगितले की, एमईए संघटना मागील 15 वर्षांहून अधिक काळ मराठा समुदायाच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी कार्यरत आहे. एमईएकडे 2000 हून अधिक सदस्य आणि 200 यशस्वी कार्यक्रमांचा विक्रम आहे.

### मत चोरीचा फेक नरेटिव्ह कोसळला

# अमित साटम यांची टीका



**मुंबई :** बिहार विधानसभा निवडणुकांचे निकाल समोर आले असून एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. बिहारमधील 243 जागांपैकी जवळपास 200 पेक्षा जास्त जागांवर भाजप-जदयू आघाडीचे उमेदवार निवडून आले आहेत. दुसऱ्या बाजूला काँग्रेस-आरजेडी महागठबंधन फक्त 35 च्या आसपास जागांवर समाधान मानावे लागले आहे. बिहारमध्ये एनडीएचा असा मोठा विजय मिळाल्यानंतर महाराष्ट्रातील 2025 च्या विधानसभा निवडणुकांची आठवण अनेकांना झाली आहे. कारण दोन्ही राज्यांत विरोधकांच्या मोठ्या लाटेच्या दाव्यांना निकालांनी छेद दिला आहे. बिहारचे राजकीय चित्र स्पष्ट होताच महाराष्ट्रातील नेत्यांनीही यावर प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली असून भाजप नेत्यांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. बिहारमधील निकाल जाहीर होताच भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनीही या राजकीय घडामोडींवर भाष्य केले. वोट चोरीचा मुद्दा उचलून विरोधकांनी जनतेची दिशाभूल केली, पण बिहारी जनतेने निकालातूनच स्पष्ट संदेश दिला, असे साटम यांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते, विरोधकांकडून उभा केलेला वोट चोरीचा कथित कथानक म्हणजे जनतेचाच अपमान असून निकालानंतर हा संपूर्ण मुद्दा कोसळला आहे. साटम यांनी म्हटले की बिहारची निवडणूक म्हणजे फक्त ट्रेलर आहे आणि खरा चित्रपट मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत पाहायला मिळेल. त्यांच्या वक्तव्याने मुंबईतील आगामी निवडणुकीसाठी भाजपने आपला सूर अधिक आक्रमक ठेवला आहे, हे स्पष्ट झाले. दुसरीकडे, शिवसेना आणि काँग्रेसकडूनही या निकालांची वेगवेगळ्या पद्धतीने व्याख्या करण्यात आली. शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आपल्या प्रतिक्रियेत केंद्र सरकार, यंत्रणा आणि स्वायत्त संस्थांवरच या निकालाचे श्रेय टाकले. त्यांचा आरोप असा की, सत्ताधाऱ्यांनी वातावरण तयार करणे, विरोधकांचे आवाज दाबणे आणि सरकारी संस्थांचा प्रभाव वापरणे यामुळे निकाल एका बाजूला झुकला. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी तर निवडणूक आयोगाचा दाखला देत बिहारचे चित्र आणि महाराष्ट्रातील काही जुन्या प्रसंगांची तुलना केली.

# शहरांच्या जवळील रस्त्यांचे सुरक्षा ऑडिट करा

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १४ :**

पुण्यातील नवले पुलाजवळ सोमवारी झालेल्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा रस्ते सुरक्षेचा मुद्दा गंभीरपणे समोर आणला आहे. या अपघातात काही नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले. याआधीही या ठिकाणी अनेकदा अपघात होऊन जीवितहानी झाली आहे. या सततच्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारकडे महत्त्वाची मागणी केली आहे. शहरांच्या जवळून जाणाऱ्या रस्त्यांची तातडीने सुरक्षा ऑडिट करण्याची तसेच प्रलंबित असलेली पायाभूत कामे तातडीने सुरू करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे.

खासदार सुळे यांनी या संदर्भात एक सविस्तर पोस्ट करत नवले पूल परिसरातील वारंवार होणाऱ्या अपघातांबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, या ठिकाणी मागील काही वर्षांत अनेक अपघात झाले असून



सुप्रिया सुळेंची मागणी

त्यात अनेकांनी प्राण गमावले आहेत. अशा घटना वारंवार होण्यामागे रस्त्यांची रचना, वाहतूक कोंडी, वेगावर नियंत्रण नसणे आणि सुरक्षा उपाययोजनांचा अभाव हे प्रमुख मुद्दे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी रस्ते सुरक्षित बनवणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी मांडले. या पोस्टमध्ये सुळे यांनी नऱ्हे ते रावेत या मार्गावरील एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामाचा मुद्दाही उपस्थित केला. या मार्गासाठी मंजुरी मिळूनही प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याचे त्यांनी सांगितले. नवले पूल परिसरात वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने एलिव्हेटेड मार्ग केवळ पर्याय नाही तर अत्यावश्यक गरज बनली आहे. या प्रकल्पामुळे अपघातांचे प्रमाण कमी होऊन वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. एलिव्हेटेड मार्ग सुरू झाल्यास मोठ्या प्रमाणावर रस्त्यावरील दबाव कमी होऊन पयार्यी मार्ग उपलब्ध होतील, असे त्यांनी नमूद केले.

खासदार सुळे यांनी केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना या संदर्भात नम्र विनंती केली आहे. नऱ्हे ते रावेत दरम्यानच्या एलिव्हेटेड मागार्चे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला द्याव्यात, अशी विनंती त्यांनी पोस्टमध्ये केली. तसेच, रस्ते सुरक्षेसाठी राष्ट्रीय स्तरावर एक विशेष मोहिम राबवण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. अपघात टाळण्यासाठी वेग मयार्दा, वाहतूक चिन्हे, रस्त्यांची दुरुस्ती आणि जागरूकता मोहिमा प्रभावीपणे राबवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

## फॉर्च्युनरमध्ये गोळ्या झाडल्या रस्त्यावर फेकले आणि चिरडले

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १४ :**

महाराष्ट्रातील पुण्यात एका मित्राने त्याच्या मित्राच्या डोक्यात गोळी झाडून त्याची हत्या केली. संपूर्ण घटना घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. यावरून पोलिसांनी आता हत्येच्या दोन गुन्हेगारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना बुधवारी सायंकाळी ७:५७ वाजता पिंपरी चिंचवड परिसरातील दिघी आळंदी रोडवर घडली. ३७ वर्षीय नितीन गिलबिले याचा दोन गोळ्या लागल्याने जागीच मृत्यू झाला. दिघी पोलिसांनी संशयित अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल केला आहे. नितीनच्या हत्येबाबत, पोलिसांना आर्थिक वादातून अमित आणि विक्रांतने त्याची गोळी झाडून हत्या केल्याचा संशय आहे. घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात असे दिसून आले आहे की नितीनच्या डोक्यात गोळी झाडल्यानंतर विक्रांतने त्याला फॉर्च्युनरच्या पुढच्या सीटवरून बाहेर काढले, रस्त्यावर फेकले, नितीनचे पाय चिरडले आणि अमितला घेऊन पळून गेला. त्याच्या कुटुंबाने दिघी पोलिस ठाण्यात अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर यांच्याविरुद्ध हत्येची तक्रार दाखल केली.

## केमिकल कंपनीला भीषण आग

**■ महासागर प्रतिनिधी जळगाव, दि. १४ :**

औद्योगिक वसाहतीत एका केमिकल कंपनीला शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अचानक मोठी आग लागली. परिसरातील नगर परिषदांच्या बंबांद्वारे आग विझविण्याचे काम करण्यात आले. औद्योगिक वसाहतीत आर. एल. चौफुलीजवळ एन सेक्टरमध्ये आर्यव्रत केमिकल कंपनी आहे. कंपनीतील कामगार कामात व्यस्त असताना, अचानक भीषण आग लागली. आगीच्या घटनेनंतर घटनास्थळी जळगाव महानगरपालिकेसह जैन इरिगेशन तसेच वरणगाव, भुसावळ, जामनेर, नशिराबाद नगर परिषदांचे अग्नीशमन बंब दाखल झाले.

# फिल्मी स्टाईल हत्येचा प्लॅन

## बहिणीच्या प्रियकरावर झाडल्या गोळ्या

**■ महासागर प्रतिनिधी, पिंपरी- चिंचवडः , दि. १४ :**

बहिणीच्या प्रियकराची हत्येची सुपारी देऊन हत्येचा प्रयत्न करणाऱ्यासह तिघांना गुंडा विरोधी पथकाने अटक केली आहे. हत्येची दहा लाखांची सुपारी देऊन तरुणीचा भाऊ गोव्याला आणि चुलता कोल्हापूरला देवदर्शनासाठी निघून गेला. या प्रकरणात सुपारी किल्लर आकाश भोकसे यांच्यासह तरुणीचा भाऊ अभिजित केदारी आणि चुलता नितीन केदारी ला अटक केली आहे. विकास केदारी हा जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. त्याच्या मानेत गोळी शिरली आहे. याबाबत किरण बाळासाहेब केदारी यांनी तक्रार दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकास केदारी आणि अभिजित केदारीच्या बहिणीचे प्रेमसंबंध होते. अनेकदा समजावूनही विकास तिच्यापासून दूर होत नव्हता. तो प्रेयसीला सोडायला तयार नव्हता. अखेर चित्रपटात साजेशी हत्येची योजना (प्लॅन) करण्यात आली.

अभिजित आणि नितीन यांनी सराईत गुन्हेगार आकाश भोकसे ला विकास च्या हत्येची दहा लाखांची सुपारी दिली. त्याला ठार मारण्याचा प्लॅन ठरला. हत्येची सुपारी देऊन भाऊ अभिजित गोव्याला आणि चुलता नितीन केदारी हा



कोल्हापूरला देवदर्शनाला निघून गेला.

११ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा च्या सुमारास पुणे- मुंबई द्रुतगती मार्गाजवळ काही अंतरावरून विकासच्या दिशेने जीवे मारण्याच्या उद्देशाने पिस्तूलातून गोळी झाडली. गोळी विकासच्या मानेत शिरली सुदैवाने तो थोडक्यात बचावला आहे. विकासवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याच्या शरीराचा खालील भाग काम करेनासा झाला आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. अभिजित, नितीन आणि आकाश यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शिरगाव पोलीस आरोपींचा शोध घेत होते. अखेर गुंडा विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांच्या टीमने आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणाहून बेड्या ठोकल्या आहेत.

### नवले पुलावरील अपघातास जबाबदार असणाऱ्या

# ट्रक चालकासह तिघांविरुद्ध गुन्हा

**■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. १४ :**

नवले पुलावर गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातास जबाबदार असलेल्या ट्रक चालकासह तिघांविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अपघातास जबाबदार असणाऱ्या ट्रक चालकासह क्लिनरचा होरपळून मृत्यू झाला.

या प्रकरणी ट्रक चालक रुस्तम रूदार खान (वय ३५, रा. किरवारी, किसनगड, जि. खेरतल, राजस्थान), मदतनीस (क्लिनर) मुस्ताक हनीफ खान (वय ३१, रा. मनापुरी, रासगड, जि. अलवर, राजस्थान), ताहीर नासीर खान (वय ४५, रा. किसनगड, राजस्थान) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक मधुकर तुपसौंदर यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अपघातात ट्रक चालक रुस्तम खान, क्लिनर मुस्ताक खान यांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अपघातात ताहीर खान गंभीर होरपळला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली. अपघातास जबाबदार असणाऱ्या ट्रक चालकासह तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०५, २८१, १२५ (अ), (ब), ३२४ (४), मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९, १७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून आणि ब्रेक नादुरुस्त होऊन नवले पुलाजवळ गुरुवारी सायंकाळी भीषण अपघात झाला. या कंटेनरने १० ते १२ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर ९ ते १० जण गंभीररित्या जखमी झाले. गुरुवारी (१३ नोव्हेंबर) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सेल्फी पॉइंटजवळ झाला. घटनास्थळी अग्निशामक दलाच्या जवानांसह सिंहगड रस्ता पोलीस, वाहतूक पोलिसांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे.

### नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही

# राज्य निवडणूक आयोगाचा दिलासा

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :**

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर उमेदवारांनी फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरावी. त्यासोबत कोणतेही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत घेवून व त्यावर सही करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करावी असा दिलासा राज्य निवडणूक आयोगाने गुरुवारी दिला. आयोगाच्या या निर्णयामुळे इच्छूक उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया किटकट असून ऑनलाईन अर्ज भरतांना अडचणीत येत असल्याचे




सांगत ही प्रक्रिया ऑफलाईन करण्याची मागणी काँग्रेसह विरोधी पक्षांनी केली होती.

काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत आयोगास पत्र पाठवून उमेदवारांचा अर्ज २० पानी असून त्यात आयोगाकडे उपलब्ध असणाराही माहिती मागविण्यात आली आहे. अर्ज भरण्याची प्रक्रिया किटकट असून त्यात सुधारणा करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली होती. त्याची दखल घेत आयोगाने आपल्या प्रक्रियेत सुधारणा केली आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर संकेतस्थळावरून त्याची मुद्रित प्रत काढून त्यावर उमेदवाराची स्वतःची व सूचकांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मूळ प्रतीसह अन्य आवश्यक कागदपत्रांचा (उदा. नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र किंवा स्वयंघोषणापत्र, निवडणुकीसाठी बॅंक खात्याचा तपशील, राखीव जागांवरील उमेदवार असल्यास जातप्रमाणपत्र, पक्षाचा उमेदवार असल्यास जोडपत्र- १ किंवा जोडपत्र- २ इत्यादी) संपूर्ण संच विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.





# भाजपाने बिहारच्या विजयाचा जिल्ह्यात ठिकठिकाणी जल्लोश






**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** भारतीय जनता पार्टी अकोला जिल्हा व महानगर च्या वतीने आपल्यामध्ये व जिल्ह्यातील ठिकाणी मोठ्या उत्साहात विजय उत्सव साजरा करण्यात आला या विषया उत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदी अमितभाई शहा यांच्या नावाचा जयघोष करत भाजपाने फटाके फोडून पेढे वाटून विजय उत्सव साजरा केला यावेळी खासदार अनुभव धोत्रे आमदार रणधीर भाऊ सावरकर माजी महापौर विजय अग्रवाल व सर्व आजी-माजी पदाधिकारी भाजपा कार्यकर्ते महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिहार विधान सभेच्या झालेल्या निवडनूकीत विर्श्वास आणी विकासाचा विजय असून बीहारी जनतेने जात पातीचे राजकारन नकरता सर्व सामान्याच्या वेदना आनी विकासासाठी सर्वेदनशील असनारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वाखाली व मूख्यमंत्री नितीश कूमार यांचे योग्य सूशासन यांचा विजय असल्याचे प्रतीपादन जिल्हा भाजपा कार्यालयासमोर झालेल्या जल्लोश प्रसंगी खा अनूप धोत्रे बोलत होते यावेळी पक्षाचे प्रदोत आ. रणधिर सावरकर जिल्हातिल आ. प्रकाश भारसाकळे आ. पिपंळे,जिल्हाअध्यक्ष संतोष शिवरकर जयंत मसने वीजय अग्रवाल माधव मानकर अंबादास ऊमाळे गीरीष जोशी सीद्धार्थ शर्मा,कृष्णा शर्मा यांचे मार्गदर्शनात सह शेकडो कार्यकर्ते च्या ऊपस्तीथीत बिहारच्या जनतेच्या कौलाचा अभीनदनासह भाजपाचा जल्लोश केला तसेच जिल्ह्यातील अकोट तेल्हारा बाळापुर मूर्तिजापुर या सह हिवरखेड भाजपा मंडळाकडुन संत तुकाराम चौक, चडींका चौक येथे रमेश दूंतोडे शहर अध्यक्ष कीरण सेदाणी मंडळ अध्यक्ष मगेश दुतोडे याचे सह महेद्र भोपळे प्रवीण येऊल नंदु शिंदपुरे अजीज खॉ अन्सारोद्दीन भाई नदु शिंदपुरे विनोद ढबाले संजय हिवराळे शांताराम कवळकार केशव कोरडे पकंज टावरी बाळासाहेब नेरकर सह शेकडो कार्यकर्त्यानी फटाक्याची आतीष बाजी व भाजपा प्रणित एन डी येच्या वीजयाचा तसेच अकोल्यातील काग्रेसचे पुढारी बिहार मधे जीथे गेले ते पराभूत झाले. असाच वीजयाचा महामेरु महाराष्टाच्या स्थानीक स्वराज्य सस्थाच्या निवडनूकामधे नगर पालीका महानगर पालीका जिल्हापरीषद मधे जनता भाजपा व महायूतिचा विजय होइल असा विर्श्वास सूद्दा आमदार रणधिर सावरकर यांनी व्यक्त केला अमीत शहा,जे पी नड्डा, सम्राट चौधरी,महाराष्टातुन देवेद्र फडनवीस वीनोद तावडे ऊत्तर प्रदेश चे योगी आदित्यनाथ मध्यप्रदेशचेमूख्यमंत्रीमोहनयादव,यांच्याप्रचाराचावबूथ प्रमूखासह कार्यकर्त्याचा मेहनतीचा व जनतैच्या विर्श्वासाचा विजय होय असे आजच्या पडिंत नेहरुजींच्या वाढदिवसाची भेट बिहारच्या जनतेनी दिल्याचे कार्यकर्त्या समवेत जल्लोश प्रसगाला अनूसरुन सावरक बोलले.

## थोडक्यात

### केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा अकोला जिल्हा दौरा

**अकोला :** केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे शनिवार दि. १५ नोव्हेंबर रोजी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा खालीलप्रमाणे: शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० वाजता शासकीय विश्रामभवन, अकोला येथे आगमन. दुपारी ३ वाजता मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते भगवान बिरसा मुंडा यांचे १५० व्या जयंती निमित्त जनजागृती गौरव वर्ष अंतर्गत राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उद्घाटन होईल. त्यानिमित्त अकोला येथील कार्यक्रमाला नियोजनभवन येथे उपस्थिती. (स्थळ : जिल्हा नियोजन समिती कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला). सोयीनुसार मातोश्री, शिवाजीनगर, मेहकरकडे प्रस्थान.

### स्ट्रीट लाईटचा बट्ट्याबोळ

**अकोला :** महापालिका क्षेत्रात गेल्या दीड ते दोन वर्षांपासून स्ट्रीट लाईट बसवण्याचे व त्यांच्या देखभाल-दुरुस्तीचे काम ( ईईएसएल) कंपनीने बंद केल्यामुळे शहरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. शहरातील जवळपास १५ टक्के स्ट्रीट लाईट सध्या बंद अवस्थेत आहेत, तर काही ठिकाणी दिवसाही लाईट सुरू असल्याचे चित्र आहे. यामुळे महापालिकेचे विद्युत विभागाचे संपूर्ण नियोजन कोलमडले आहे. शासनाने महापालिका क्षेत्रातील नवीन स्ट्रीट लाईट बसवण्याचे आणि त्यांच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी २०१८ मध्ये काम सुरू केलेल्या ईईएसएल कंपनीकडे सोपवली होती. मात्र, देयके न मिळाल्याच्या कारणावरून कंपनीने दीड-दोन वर्षांपासून हे काम थांबवले आहे. ईईएसएलने काम थांबवल्याने महापालिका विद्युत विभाग स्वतः कामाचे नियोजन करत आहे.

### कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन

**पातुर :** पातुर तालुका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने स्व. नलिनी राऊत बी. ए. एम. एस.कॉलेज येथे आयोजित करण्यात आलेल्या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन सर्जन डॉ. विजय जाधव यांच्या हस्ते पार पडले. या शिबिरात पातुर तालुक्यात एकूण ७ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या. पातुर तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेसाठी ११ नोव्हेंबर २०२५ रोजी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती आणि १२ नोव्हेंबर २०२५ रोजी या वर्षातील हे पहिले कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले.. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली केले.

## बालदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात स्वाक्षरी अभियान





**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** बाल दिनानिमित्त बालकांची हक्क व अधिकार याबाबत जनजागृतीसाठी महिला व बालविकास विभागातर्फे स्वाक्षरी अभियान जिल्हाधिकारी कार्यालयात राबविण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी स्वाक्षरी करून अभियानाचा शुभारंभ केला. बालकांसाठी समाजात, परिसरात सुरक्षित, आनंददायी वातावरण निर्माण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. बालकांचे हक्क, स्वातंत्र्य या मूल्यांची जपणूक करतानाच त्यांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यक्रम अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसतकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी राजश्री कोलखेडे, ॲड. संजय सेंगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रश्मी बन्सल, अँड अनिता गुरव, सुनील लाडुलकर व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## अकोला महानगरपालिका नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला

### आरक्षण नव्याने निश्चित करण्याचे आयोगाचे आदेश

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करीता दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रमिलाताई ओक हॉल सभागृह येथे अनुसुचित जाती महिला, अनुसुचित जमाती महिला व ईतर मागास वर्ग महिला तसेच सर्व साधारण महिला यांचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यात येउन मा.राज्य निवडणूक आयोगाचे मान्यता करिता पाठविण्यात आले होते. सदर आरक्षणातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व ईतर मागास वर्ग प्रवर्ग सोडतीव्दारा निचिश्त केलेले आरक्षण मा.राज्य निवडणूक आयोग यांनी यथास्थिती ठेवून ईतर मागास वर्ग प्रवर्ग व सर्व साधारण महिला आरक्षण पुन्हा सोडतीव्दारे निश्चित करण्याबाबत कळिवले आहे. त्याकरिता शासनाने २० मे २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या तरतुदीमधील नियम ६ (३) व ६ (४) नुसार नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला व सर्व साधारण महिला यांचे आरक्षण निश्चित करून राज्य निवडणूक आयोगाचे मान्यतेकरीता तात्काळ पाठवावे असे निर्देशीत केले आहे.त्या अनुषंगाने नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला व सर्व साधारण महिला यांचे आरक्षण थेट व सोडत पध्दतीने निश्चित करण्याकरिता सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. अकोला महानगरपालिकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे सोडत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी संबंधीतांनी याची नोंद घेऊन अकोला महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## सर्व सृष्टी आदीशक्तीच्या अधीन-पु मकरंद बुवा

### मुंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या कथेत उसळली गर्दी

**अकोला :**सर्व जग हे चैतन्याने भरलेले असून अगदी सृष्टीच्या कणाकणात संचारलेल्या अनु रेणूतही चैतन्य सामावलेले आहे. भिन्न प्रकृती, भिन्न रंग, रूप, गंध व गुण या सृष्टीत समाविष्ट आहेत. एवढेच नव्हे तर सगळ्या प्राणीमात्रांचा गंधही वेगवेगळा असतो. सर्व चराचरात इलेक्ट्रॉन, प्रोटॉन अणू रेणू भरले असले तरी यात नक्की वेगळे काही असून ही आदिशक्तीची चिरंतन चैतन्यता आहे. यामुळेच हे सर्व घडत असून सर्व सृष्टी व चराचर विश्व हे आदिशक्तीच्या अधीन असल्याचे प्रतिपादन देवी भागवत कथाकार पु मकरंद बुवा सुमंत रामदासी यांनी केला. देवी भागवत कथा आयोजन समितीच्या वतीने योगाभ्यानंद श्री माधवनाथ महाराज यांच्या कृपेने व स्व डॉ टी व्ही कुलकर्णी यांच्या स्मृतीत स्थानिक मुंगीलाल बाजोरिया विद्यालय प्रांगणात सुरू असलेल्या देवी भागवत कथेत पु मकरंद बुवा यांनी कथेचे द्वितीय पुष्प गुंफले.

आदिशक्तीच्या चैतन्यतेची अधिक व्याप्ती विशद करताना ते म्हणाले, आपल्या पूर्व कर्माने आपल्या शरीराला काही स्पंदने बहाल केली आहेत. जशी देहाला संरचना आहे, तशी मनाला पण संरचना आहे. शरीराच्या आत सूक्ष्म शरीर असून त्या सूक्ष्म शरीराच्या आतही एक अतिसूक्ष्म शरीर आहे. अशा संरचनेत कर्माची बीजे ज्या ठिकाणी आहेत त्याला प्रारब्ध असे म्हणतात. याच प्रारब्धातून कर्माची गती सुचारु पद्धतीने चालत असल्याचे त्यांनी सांगितले.

## डाबकी रोड येथील चोरीची चोराकडून कबुली

### ७०,९३० ग्रॅम सोन्याचे दागीने;मुद्देमाल जप्त





**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** हकीकत अशा प्रकारे आहे की, पो. स्टे डाबकी रोड अकोला येथे दिंनाक १७.१०.२०२५ रोजी विश्वमानव मंदीर बालाजी नगर येथे फीर्यादी हे त्याचे पत्नीसह बाहेर गावी गेला असता त्याचा मुलाचा मित्र याने याच संधीचा फायदा घेवुन फिर्यादीचे घरामधुन आलमारी मधील सोनेचे दागीने हे चोरी केले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून पो. स्टे डाबकी रोड येथे अप क्र.३२८/२५ कलम (अ) BNS चा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.सदर गुन्हा हा गुंतागुंतीचे असल्याने सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक सा. अकोला यांचे आदेशाने पो.स्टे. डाबकी रोड चे तत्कालीन ठाणेदार अभिषेक अंधारे यांनी तपास करावा.

अशा प्रकारच्या सुचना दिल्याने व गुन्हयातील आरोपी हा घटनेपासुन फरार असल्याने त्यास दिनाक १२/११/२०२५ रोजी अटक करून त्याचा पिसीआर घेण्यात आला त्याला विश्वासात घेवुन विचारपुस केली असता सदर गुन्हयात चोरी गेलेले सोन्याचे दागीने हे एका खाजगी बँकेत गहाण ठेवुन त्यावर गोल्ड लोन केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने ७०.९३० ग्रॅम किंमत अंदाजे ५,३२,८२०/रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

## आज क्रांतिसूर्य वीर बिरसा मुंडा जयंती सोहळा

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** आदिवासी समाजाचे दैवत, स्वातंत्र्याच्या आद्य लढ्यातील प्रखर योद्धा आणि जनतेच्या अढळ विश्वासाचा आधार असलेल्या क्रांतिसूर्य वीर बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त आज शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५ रोजी अकोल्यात विविध उपक्रमांनी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. क्रांतिसूर्य वीर बिरसा मुंडा उत्सव समितीतर्फे या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाची सुरुवात संध्याकाळी ५ वाजता बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेच्या पूजनाने होणार आहे. त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता भव्य जयंती मिरवणूक काढली जाणार आहे. ही मिरवणूक अशोक वाटिका ते आळशी प्लॉट, खंडेलवाल भवनजवळ, अकोला या मार्गाने संचलित होईल. परिसरात उत्सवाचा जल्लोष अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समितीने केले आहे. पूजनानंतर बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारे प्रेरणादायी भाषण होणार असून त्यामध्ये त्यांच्या संघर्षमय आयुष्याची माहिती देण्यात येईल. कार्यक्रमाचा समारोप अल्पोपहार आणि गोंडी लोकनृत्याच्या सांस्कृतिक सादरीकरणाने होणार आहे.या जयंती उत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजन समिती चे अध्यक्ष राजु गोंधळेकर, उपाध्यक्ष धनंजय गोंधळेकर, कुणाल कुमरे, सचिव जितेंद्र मेश्राम, कोषाध्यक्ष प्रशांत कोवे, समिती सदस्य बबनराव पेंदोर, अशोक भोसले, डॉ. प्रकाश चांदेकर, विनोद गेडाम, सुभाष मेश्राम, राजेश मेश्राम, गजानन चांदेकर, चंदु सिडाम, राजु गोंदेकर, हिरामण कुंभरे, रवींद्र गेडाम, विलास मेश्राम, अनिल कोवे, आशिष नैताम, अमोल मडावी, संतोष सिडाम, विक्रांत कुरशेंगे, कार्तिक उइके. आदींनी केले आहे असे प्रसिद्धी पत्रकात चंदू सीडाम यांनी कळिवले आहे

## जुना कार मालक निघाला चोर

### ७,८०,००० रू चा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपी ताब्यात



**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** एक महिन्यापुर्वी म्हणजे दिनांक १३/१०/२०२५ रोजी पो.स्टे. खदान हद्दीत हिंगणा रोड परिसरात दोन अज्ञात इसमांनी मोपेड वाहनावर येवुन कारवर्ल्ड गॅरेज समोर उभी असलेली स्विफ्ट डिझायर क्रमांक एम.एच. ३० बी. एल. ६८४४ ची चोरी केली होती, सदर घटनेबाबत पो.स्टे. खदान येथे अप क्र. ८३९ / २०२५ कलम ३०३ (२) भा. न्या. सं. प्रमाणे दाखल करण्यात आला होता.मा. पोलीस अधीक्षक सा. यांचे आदेशाने सदर गुन्हयाचा संमातर तपास करत असतांना पो. नि. शंकर शेळके, स्था. गु.शा. अकोला यांचा पथकाला मिळालेल्या गोपनीय माहिती वरून तसेच तांत्रीक विश्लेषणावरून संशयीत इसम नामे अक्षय मनोहर मसने, रा. मोठी उमरी तसेच त्याचा मित्र नामे गणेश प्रविण पालवे, रा. खेडकर नगर, जवाहर नगर अकोला यास ताब्यात घेवुन त्यांना विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हयाची कबुली दिली तसेच त्यांचे जवळुन सदर गुन्हयातील चोरी गेलेली स्विफ्ट डिझायर क्रमांक एम.एच. ३० बी. एल. ६८४४ कि. अं. ७०००००/ रु ची भुसावळ येथुन जप्त करण्यात आली.

तसेच चोरी करतांना वापरण्यात आलेली सुझुकी ॲक्सेस विना नंबर प्लेट असलेली कि. अं. ८०,०००/ रूची असा एकुण ७,१०,०००/ रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला तसेच नमुद दोन्ही आरोपीतांना पो.स्टे. खदान यांचा ताब्यात देण्यात आले. तपासादरम्यान असे दिसुन आले कि, आरोपी अक्षय मनोहर मसने हा सदर कार चा पुर्वीचा मालक होता कर्ज थकल्यामुळे सदर वाहन फायनन्स कंपनीने ओढुन नेवुन जप्त केले होते. त्यानंतर कंपनीने लिलावाव्दारे गुन्हयातील फिर्यादी यांना विक्री केली होती. सदर कार फिर्यादी यांनी हिगणा रोड वरील कारवर्ल्ड गॅरेज येथे दुरूस्ती करीता आणली होती. परंतु, जुने कार मालक याचे कडे जि.पी. एस. लोकेशन चा ॲक्सेस व दुसरी चाबी होती. याचाच फायदा घेवुन आरोपी याने मित्राच्या मदतीने कारचा शोध घेवुन त्याचे जवळ असलेल्या चाबीच्या साहयाने कार ची चोरी केली होती.

## कु. अवंती गजानन हरणे यांची 'लेंड-ए-हँड इंडिया' फेलोशिपसाठी निवड



**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद नगर खडकी अकोला येथील पंच फुलाबाई पाटील समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी आणि कर्वे समाजकार्य महाविद्यालय, पुणे येथून नुकतेच एम.एस.डब्ल्यू. पदवी प्राप्त केलेली कू. अवंती गजानन हरणे हिने उल्लेखनीय यशाची नवी भर घातली आहे. शिक्षणातील गुणवत्ता, कौशल्याधारित दृष्टीकोन आणि विद्यार्थीदशेपासून केलेल्या समाजाभिमुख कार्याचा उल्लेखनीय ठसा उमटवत तिने महाविद्यालयीन कॅम्पस मुलाखतीत प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर प्रतिष्ठेच्या लेंड-ए-हँड इंडिया संस्थेच्या 'स्किल ऑन व्हील' फेलोशिपसाठी तिची निवड झाल्याचे संस्थेने अधिकृत पत्र देऊन कळिवले आहे.

कौशल्य शिक्षणाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करणे, तसेच शिक्षण क्षेत्रात भारत सरकारच्या कौशल्याधारित उपक्रमांचा प्रसार करणे या उद्देशाने 'लेंड-ए-हँड इंडिया' संस्था देशभरात कार्यरत आहे. हिमाचल प्रदेश समग्र शिक्षण अंतर्गत संस्थेच्या वतीने राज्यातील शाळांमध्ये विविध शिबिरे, प्रशिक्षण कार्यक्रम आणि कौशल्यवर्धन उपक्रम सातत्याने राबवले जातात. युवा पिढीला रोजगाराच्या नव्या उपलब्धी निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'स्किल ऑन व्हील' या अभिनव उपक्रमासाठी यावर्षी कू. अवंती गजानन हरणे हिची निवड झाली आहे. अकोला जिल्ह्यातील प्रसिद्ध समाजसेवक गजानन हरणे यांची अवंती मुलगी आहे.या निवडीमुळे विदर्भ अकोला जिल्ह्याचा तसेच संबंधित महाविद्यालयांचा गौरव वाढला असून, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, तसेच विविध सामाजिक संस्था, संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी कू. अवंती हरणे हिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, कौशल्य शिक्षण क्षेत्रातील तिच्या भावी वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर कागदपत्र अपलोड करण्याची आवश्यकता नाही

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरणे आवश्यक आहे. त्यासोबत कोणतेही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही.

संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत (प्रिंटआऊट) घेवून व त्यावर सही करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करणे आवश्यक आहे, असे स्पष्टिकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecelec.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर संकेतस्थळावरून त्याची मुद्रित प्रत (Print Out) काढून त्यावर उमेदवाराची स्वत:ची व सूचकांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

त्यानंतर त्या मूळ प्रतीसह अन्य आवश्यक कागदपत्रांचा (उदा. नगरपरिषद/नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र किंवा स्वयंघोषणापत्र, निवडणुकीसाठी बँक खात्याचा तपशील, राखीव जागांवरील उमेदवार असल्यास जातप्रमाणपत्र, पक्षाचा उमेदवार असल्यास 'जोडपत्र- १' किंवा 'जोडपत्र- २' इत्यादी) संपूर्ण संच विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक आहे.

इच्छूक उमेदवारांना नोंदणीसाठी सुरुवातीपासून सुरू केलेले संकेतस्थळ १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत २४ तास सुरू असेल. तोपर्यंत त्यावर इच्छूक उमेदवारांना कोणत्याही वेळी नोंदणी करता येते व नोंदणी करताना तयार केलेला लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्याकडे जपून ठेवावा लागतो. कारण नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरण्यासाठी ते आवश्यक असते.

सही केलेल्या प्रिंटआऊटसह आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांचा संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांसह नामनिर्देशनपत्र शनिवारी, १५ नोव्हेंबर २०२५ या सुटीच्या दिवशीसुद्धा स्वीकारण्यात यावेत.

अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र रविवारी (ता. १६) ते स्वीकारण्यात येणार नाहीत. इच्छूक उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचेही निर्देश सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना देण्यात आले आहेत, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळिवले आहे.

# जिवाने मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला अटक

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : सदर गुन्हयातील फिर्यादी नामे मौ. फैजल मौ. फारूख वय २४ वर्षे रा. धोबी खदान जवळ अकोला हे कंपनी मध्ये कामा करीता गेले असता आरोपी रमीज अहेमद शेखजी हा फिर्यादी यांचे जवळ आला व फिर्यादी यांचा भाउ शोएब अहेमद मौ. फारूख याला म्हणाला की, स्कॅनचे काम कर असे म्हटले असता फिर्यादी यांचे भावाने म्हटले की, तु कंपनीचा मालक नाही, असे म्हटले असता फिर्यादीचे भाउ शोएब अहेमद मौ. फारूख यास तु आरोपी याने जुने वादाचे कारणा वरून शिवीगाळ करून लोखंडी पाईपने डोक्यावर, हातावर मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून पो. स्टे.ला दिनांक १०/११/२०२५ रोजी अप क्र.३१५/२०२५ कलम ११८(२), ३५१ (२), ३५२ बि. एन. एस प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.



सदर गुन्हयातील आरोपी रमीज अहेमद शेखजी रा. खैर मौहम्मद प्लॉट मक्का मस्जिद जवळ अकोला यास दिनांक ११/११/२०२५ रोजी अटक केली गुन्हयाचे गांभीर्य पाहुन मा.न्यायालयाने आरोपी याचा दिनांक १५/११/२०२५ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला. गुन्हयातील तांत्रीक पुरावे, परीस्थितीजन्य पुरावे अकोला फॉरेन्सीक टिमने घटनास्थळावरून प्राप्त केले आहे. त्यामुळे यापुढे गुन्हेगारांना अधिक शिक्षा होण्यास मदत मिळणार आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक साहेब, अकोला, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री.बि.चंद्रकांत रेड्डी साहेब अकोला, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.सुदर्शन पाटील साहेब यांचे म र्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक राहुल जंजाळ, ग्रेड पोउपनि देविदास गायकवाड, पो. उपनि. दयाराम राठोड, पो.हे.कॉ. सतिष प्रधान, अनिल दांदळे, पोकों भुषण मोरे, निलेश वाकोडे यांनी केली आहे. गुन्हयाचा पुढिल तपास ग्रेड, पोउपनि देविदास गायकवाड पो.स्टे. एमआयडीसी अकोला हे मा. वरीष्ठांचे मार्गदर्शना प्रमाणे करीत आहेत.

पोलीस स्टेशन एमआयडीसी अकोला हद्दीत दिनांक ०८/१०/२०२५ नंतर मा. अर्चित चांडक पोलीस अधिक्षक अकोला यांचे मागदर्शनात सार्वजनिक ठिकाणी मदयप्राशन करणा-या एकुण ९७ मदयपीवर महा. पोलीस कायदा अन्वये कार्यवाही करण्यता आलेली आहे.दिनांक ०८/१०/२०२५ रोजी एमआयडीसी अकोला प्रतिनिधी यांना दिलेल्या शब्दांची पुन्हा प्रचिती आली. अकोला एमआयडीसी मध्ये सुरू असलेले उदयोग, त्यांचे उदयोजक तसेच कुशल / अकुशल कामगार यांना भय मुक्त वातावरण निर्माण करून उदयोगांचा विकास होण्यास कटीबध्द अकोला पोलीस यांचे वतीने मा. पोलीस अधिक्षक अर्चित चांडक सा. यांनी हमी दिली होती.

# कापसे जि.प.च्या नव्या अतिरीक्त सीईओ

**अकोला :** राज्य शासनाच्या प्रशासनिक फेरबदलात महाराष्ट्र विकास सेवा अंतर्गत देण्यात आलेल्या बढतीमध्ये जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या रिक्तपदी श्रीमती एम. व्ही. कापसे यांची वर्णी लागली आहे.

त्या सहाय्यक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत होत्या. तसेच प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या रिक्तपदी श्रीमती एम. ए. देसाई यांना नियुक्ती देण्यात आली आहे.

# दृष्काळ मदत साठी शेतकऱ्यांचे तहसील कार्यालयात रांगा



■तेल्हारा, दि.१४ (प्रतिनिधी) : शासनाने या वर्षी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांना दृष्काळि मदत जाहीर केली मात्र तालुक्यात अद्याप हि पन्नास टक्के शेतकरी यांना मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांनी तहसिल कार्यालयात रांगा लावल्या आहेत.

शासनाने शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून व तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी मुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते शासनाने दखल घेत शेतकऱ्यांना हेक्टरी दहा हजार रुपये मदत जाहीर केली मात्र तालुक्यात केवळ पन्नास टक्के शेतकरी यांना मदत मिळाली आहे अतिवृष्टी चि मदत मिळावी .

यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी तेल्हारा तहसील कार्यालयात रांगा लावल्या आहेत. माझे कडे चार एकर जमीन आहे शासनाने दृष्काळि मदत जाहीर केली मात्र मला अद्याप मदत मिळाली नाही.

# शिक्षक मतदारसंघ निवडणूक प्रारूप मतदार यादी ३ डिसेंबरला प्रसिद्ध होणार

## निवडणूक आयोगाकडून सुधारित कार्यक्रम

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : शिक्षक मतदार संघासाठी १.११.२०२५ अर्हता दिनांकावर आधारित मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा नोंदणी कार्यक्रम सुरू आहे. मतदार नोंदणीसाठी प्राप्त अर्जांवर कार्यवाही पूर्ण होण्यासाठी पुरेसा अवधी मिळण्यासाठी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्याची तारीख वाढविण्यात आली आहे. तसा सुधारित कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. सुधारित कार्यक्रमानुसार, प्राप्त अर्जांनुसार प्रारूप मतदारयाद्या तयार करणे, छपाई आदी कार्यवाही दि. २८ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होईल. प्रारूप मतदारयाद्यांच्या प्रसिद्धीचा दिनांक ३ डिसेंबर (बुधवार) असा करण्यात आला आहे. दि. ३ ते १८ डिसेंबर दरम्यान दावे, हरकती स्वीकारण्याचा कालावधी असेल. मतदारयादीच्या अंतिम प्रसिद्धीचा दिनांक १२ जानेवारी (सोमवार) असा करण्यात आला आहे.

## अकोला जिल्ह्यातील बीएसएनएल आणि पोस्टल खात्यातील

# रिटायर्ड कर्मचाऱ्यांच्या लाईफ सर्टिफिकेट साठी घेण्यात आला कॅम्प




■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : भारत संचार निगम सह पोस्टल खात्याच्या पेन्शन धारक कर्मचाऱ्यांना दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात लाईफ सर्टिफिकेट जमा करावे लागते.मात्र हे लाईफ सर्टिफिकेट काढण्यासाठी अनेक पेन्शन धारकांची भटकंती होते ही भटकंती थांबून एकाच ठिकाणी सहज हे लाईफ सर्टिफिकेट मिळावे यासाठी ऑल इंडिया सेंट्रल गव्हर्नमेंट पेन्शनर्स असोसिएशन,अकोला शाखे च्या वतीने आज डिजीटल लाईफ सर्टिफिकेट अर्थात हयातीचा दाखला काढण्याकरिता सी.टी. ओ.कंपाऊंड मधे कॅम्प घेण्यात आला.

या लाईफ सर्टिफिकेट काढण्याच्या कॅम्प मुळे पेन्शन धारकांची लाईफ सर्टिफिकेट काढण्यासाठी होणारी परवड थांबली आहे.वृद्ध पेन्शन धारकांनी समाधान व्यक्त केले आहे.या लाईफ सर्टिफिकेट कॅम्प करिता ऑल इंडिया सेंट्रल गव्हरमेंट एम्प्लॉयीज असोशीएशयन अकोला शाखेचे अध्यक्ष श्रीकृष्ण फेंडर,सचिबदेवीदास लगड आणि प्रभाकर नवथळे,कोषाध्यक्ष आनंद भारंबे यांच्या सह अशोक पवार आणि अमरनाथ झापर्डे यांनी कॅम्प यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना मदतीचे वितरण

- ऑगस्ट - सप्टें.मधील अतिवृष्टीबाधितांना २५५ कोटी मदत निधीचे वितरण
- अतिवृष्टी व पूर बाधितांना रब्बी हंगाम बियाण्यासाठी १९१ कोटी मदत

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : जिल्ह्यात ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी, पावसाने झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने एकूण २ लक्ष ७० हजार शेतक-यांना २५५ कोटी १५ लक्ष ६७ ह. मदत वितरण, तसेच अतिवृष्टी व पुरामुळे बाधित २ लक्ष २१ हजार ७०७ शेतक-यांना रब्बी हंगामासाठी बियाणे व इतर बाबींकरिता प्रतिहेक्टरी रू. १० हजार रू. प्रमाणे १९१ कोटी ४३ लक्ष डीबीटी पद्धतीने मदत वितरण झाले.

अतिवृष्टी आणि पुरामुळे निर्माण झालेल्या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर शासनाने मदत व सवलती जाहीर केल्या. जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनीही यासंदर्भात बैठका घेऊन सविस्तर पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

त्यानुसार ऑगस्ट-सप्टेंबरमधील नुकसानीच्या अनुषंगाने मदत वितरण व रब्बी हंगाम बियाणे आदींसाठी मदतीची वितरण प्रक्रिया प्रशासनाने राबवली. ऑगस्टमधील अतिवृष्टीने शेतीपिकांचे (२ हे. पर्यंत) झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने १ लक्ष १ हजार ५६० शेतक-यांना ७७ कोटी ३४ लक्ष ९९ हजार इतका निधी वाटप आहे. तालुकानिहाय निधीवाटप असा : अकोट (२१ हजार २५४ शेतकरी, १३ कोटी १४.४२ लक्ष), तेल्हारा (६ हजार ४१७ शेतकरी, २ कोटी ९२.१४ लक्ष), बाळापूर (७६६ शेतकरी, ४४.२७ लक्ष), पातूर (२ हजार ७९६ शेतकरी, १ कोटी ५९.६५ लक्ष), अकोला (३५ हजार १४५ शेतकरी, ३० कोटी ९३.०३ लक्ष), मूर्तिजापूर (३५ हजार १८२ शेतकरी, २८ कोटी ३१.४८ लक्ष).

सप्टेंबरमधील अतिवृष्टीने शेतीपिकांचे (२ हे. पर्यंत) झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने १ लक्ष ६८ हजार ९३२ शेतक-यांना १७७ कोटी ८० लक्ष ६८ हजार इतका निधी वाटप आहे. तालुकानिहाय निधीवाटप असा : अकोट (२१ हजार १७५ शेतकरी, २५ कोटी १६ लक्ष ४३ ह.), तेल्हारा (२७ हजार ३३३ शेतकरी, २४ कोटी ४४ लक्ष ३९ ह.), बाळापूर (३३ हजार ५८८ शेतकरी, २६ कोटी ८८ लक्ष ६५ ह.), पातूर (२४ हजार ९२५ शेतकरी, २२ कोटी ४१ लक्ष ७० ह.), अकोला (१४ हजार ११ शेतकरी, रक्कम ११ कोटी ३८ लक्ष ५७ ह.), बार्शिटाकळी (३१ हजार ५८५ शेतकरी, २९ कोटी ४ ल. ३८ ह.), मूर्तिजापूर १६ हजार ३१५ शेतकरी, ३८ कोटी ४६ ल. ५६ ह.).

अतिवृष्टी व पुरामुळे बाधित शेतक-यांना रब्बी हंगामा साठी बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरिता प्रतिहेक्टरी रू. १० हजार रू. प्रमाणे डीबीटी पद्धतीने मदत वितरण (दि. १४ नोव्हेंबरपर्यंत) २ लक्ष २१ हजार ७०७ शेतक-यांना १९१ कोटी ४३ लक्ष इतकी मदत करण्यात आली आहे. तालुकानिहाय - अकोला (३७ हजार ८४८ शेतकरी, ३७ कोटी ३६ लक्ष ६ ह.), अकोट (३२ ह. २६० शेतकरी, २७ कोटी १९ लक्ष ३८ ह.), बाळापूर (३३ हजार ७८९ शेतकरी, २८ कोटी ७४ लक्ष ८२ हजार), बार्शिटाकळी ( २७ हजार ३४५ शेतकरी, २७ कोटी ५१ लक्ष ७३ ह.), मूर्तिजापूर (४० हजार ६४४ शेतकरी, २८ कोटी ६२ लक्ष ३४ ह.), पातूर (२२ हजार २२८ शेतकरी, १९ कोटी ८५ लक्ष ४ ह.), तेल्हारा २७ हजार ५९३ शेतकरी (२२ कोटी १२ लक्ष ७४ ह.).

# युवकांची बलोपासना हेच स्व मंगेश गावंडे यांचे ध्येय



■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : युवाशक्तीने बलोपासना व अध्ययन करून समाजात जागृती निर्माण करावी यासाठी जीवनभर कार्यरत स्व मंगेश गावंडे यांच्या विचारापासून युवकांनी प्रेरणा घ्यावी असे भावोद्गार माजी नगरसेवक मंगेश काळे यांनी व्यक्त केले. स्थानीय सहकार नगर येथील शिवस्मारक परिसरात शुक्रवारी युवकांचे प्रेरणास्थान, भारतीय विद्यार्थी सेनेचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष तथा ब्रम्हा फीटनेस खडकी संस्थापक स्व मंगेश गावंडे यांचा २१ वा स्मृतिदिन संपन्न झाला.

स्व मंगेशभाऊ गावंडे मित्र परिवाराच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात माजी नगरसेवक मंगेश काळे, युवा नेते पंकज जायले,माजी नगरसेवक व मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांनी स्व मंगेश गावंडे यांच्या प्रतिमेला हारार्पण करून त्यांना सामूहिक आदरांजली राहिली. यावेळी अनेक मान्यवरांनी स्व मंगेश गावंडे यांच्या सेवा कार्याचा आलेख प्रस्तुत करीत त्यांना आपल्या विचारातून आदरांजली वाहली. यावेळी बहुसंख्य नागरिक व युवक उपस्थित होते.


## E-Tender Notice

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | IC-II / Rfx No. 3000063234 / Work contract for revamping of various control & instrumentation panels post DCS upgradation of Unit-6, CSTPS, Chandrapur / Rs.1974960/- |
| 2 | BM-I / Rfx No. 3000063129 (Refloated) / Work of reconditioning of damaged journal shaft, upper & lower journal housing for journal assy. for coal mills XRP 803 of Unit-3 and 4, 210MW X 2 at CSTPS, Chandrapur / Rs. 2720000/- |
| 3 | BM-I / Rfx No. 3000063202 / Work of fabrication & erection of roof shed over service building 210 MW, boiler feed station, firing floor room, boiler basement room, boiler outlet & other valves & erection of grill platform at boiler feed station & boiler lift pathway with material safety related (unsafe condition) works in Unit-3 and 4, CSTPS, Chandrapur / Rs.7598677/- |
| 4 | MSB / Rfx No. 3000063307 / Annual work contract of material handling (0 to 20 MT) and other works pertaining to at MS-(B), CSTPS, Chandrapur for 2 years / Rs. 15326225.94/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 04)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**



**CHANGE IN NAME**

We have Change My Daughter Name in Daughter Passport No is **(S1025494)**
---From---
**INAAYA FATEMA MOHAMMAD ZIYA UR REHMAN**
---TO---
**INAAYA FATEMA MOHAMMAD ZIA UR REHMAN**
Father Name - MOHAMMAD ZIAUR REHMAN MATEEN UR REHMAN **(AA656712)**
Mother Name - MONA SADAF MOHAMMAD ZIA UR REHMAN **(S2868268)**
Our Residential Address is - Near Famous Welding Khair Mohammad Plot Akola 444002.

I Have Change My Name in My Daughter Passport :- Her Passport No **(S1025494)**
---------From----------
**MONA SADAF MOHAMMAD ZIA UR RAHMAN**
---------TO--------------
**MONA SADAF MOHAMMAD ZIA UR REHMAN**
My Residential Address is :- Near Famous Welding Khair Mohammad Plot Akola MH 444002.


# संसार पथश्रांतांची सावली ज्ञानेश्वरी : हभप ज्ञानेश्वरमहाराज

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : तत्त्वज्ञानाच्या बाबतीत अजून पर्यंत जरी सर्वच तत्वज्ञांचे एकमत झाले नाही व कदाचित होणारही नाही. तरीपण संसारीक जीवनातील दुःखाच्या बाबतीत मात्र सर्वभाषिक साहित्यामध्ये एक वाक्यता आढळून येते. तसेच त्यातून बाहेर पडण्याचे वेगवेगळे मार्ग अनेक ग्रंथातून वाचण्याकरिता मिळतात. त्यातही संपूर्ण विश्वाने ज्यांना माऊली ही मानद पदवी बहुमानाने बहाल केली व त्यांच्या प्रतिभेला मानाचा मुजरा करीत त्यांच्या अमोघ वाणीतून निसृत झालेल्या ग्रंथाचा सुद्धा अंगीकार केला. तो ज्ञानेश्वरी ग्रंथ म्हणजे अखिल विश्वातील संसार पथ श्रांताची माऊली कृत सावलीच आहे. परीस नावाचा एक दगड असून , तो लोखंडाला लागल्यानंतर त्याचे सोने करतो.

ह्या गोष्टी पुराणांच्या व प्रवचनांच्या माध्यमातून फक्त ऐकावातच आहेत. प्रत्यक्षात मात्र अजून पर्यंत त्याचे दर्शन सांगणाऱ्याला व ऐकणाऱ्याला झालेले नाही. प्रत्यक्षात झाले असते तर कदाचित ते दोघेही मंडपात कथा सांगण्या व ऐकण्यासाठी सापडले नसते हे तितकेच खरे आहे. परंतु चौऱ्यांशीलक्ष योनी पैकी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी व जीवनोध्दाराचे एकमेव साधन असलेली मानव योनी असून , त्या मानवी जीवनाचे नुसते सुवर्ण ( सोने ) नव्हे तर , त्या सर्वांना सवर्ण (आपणा समान) बनविणारा परिस



म्हणजेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी होय. म्हणूनच महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाने प्रबोधनाच्या क्षेत्रातील विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मोडीत काढून याच ग्रंथाच्या परिसस्पर्शाच्या माध्यमातून अठरा पगड जाती जमातीच्या सर्व लोकांना आपले विचार व्यक्त करण्याकरिता हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत, स्पृशास्पृश्य भेदाभेदाला पूर्णतः मूठ माती देऊन सवर्णता प्राप्त करून देण्याची अलौकिक क्रांती घडवून आणली. आणि त्या सर्वांना माऊलीच्या कृपेची शितल सावली प्रदान केली आहे.

## साहित्य,सामाजिक व शेतकरी चळवळीचा खंदा शिलेदार धनंजय मिश्रा यांना मातृशोक



अकोल्याच्या साहित्य, पत्रकारिता, सामाजिक व शेतकरी चळवळीत वावर असणाऱ्या धनंजय मिश्रा यांच्या मातोश्री सौ कुसुम ताई भैय्यासाहेब मिश्रा यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. रोहणा येथील माजी सरपंच व गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक भैय्या साहेब मिश्रा यांच्या त्या पत्नी होत्या.पती भैय्यासाहेब मिश्रा दोन मुले किशोर मिश्रा, धनंजय मिश्रा, एक मुलगी नातवंडे व मोठा नातेवाईक, सामाजिक गोतावळा त्यांनी आयुष्यभर प्रेमाने सांभाळला.त्यांच्यावर उद्या दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सिंधी कॅम्प स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात येतील ही अंत्ययात्रा दुर्गा हाईट अपार्टमेंट गुरुकुल नगरी कोठारी वाटिका मलकापूर येथून निघेल.


RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ेमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

# भारतभरातील हजारो जीवनांमध्ये बदल घडवून आणल्यानंतर, मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची हंगर फ्री वर्ल्ड मोहीम आता जागतिक स्तरावर

**नागपूर, १४ नोव्हेंबर :** मलाबार गोल्ड अँड डायमंड्स, जगातील पाचव्या क्रमांकाची दागिन्यांची रिटेल कंपनी आणि भारतातील सर्वात आघाडीची सामाजिक जबाबदारी जपणारी संस्था, यांनी त्यांच्या प्रमुख हंगर फ्री वर्ल्ड उपक्रमाचा विस्तार इथिओपियापर्यंत केल्याची घोषणा केली आहे. भारतात आणि झांबियामध्ये उल्लेखनीय परिवर्तन घडवल्यानंतर आता हा उपक्रम आफ्रिका खंडातील पुढच्या टप्प्यात प्रवेश करतो.

भारताच्या करुणा, सहकार्य आणि सामूहिक प्रगतीच्या विचारांवर आधारित हा उपक्रम जागतिक स्तरावर भारतीय व्यवसायांच्या प्रभावाचे उत्तम उदाहरण ठरत आहे. भारतात सिद्ध झालेला हा मॉडेल आता उपासमार आणि शैक्षणिक विषमता दूर करण्याच्या जागतिक चळवळीत रूपांतरित होत आहे. मलाबार आपल्या निव्वळ नफ्याच्या ५% रक्कम सातत्याने सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करते. हे प्रमाण भारतातील अनिवार्य सीएसआर नियमांपेक्षा दुपटीहून अधिक आहे. या माध्यमातून कंपनी सामाजिक जबाबदारीची व्याप्ती आणि प्रामाणिकता नव्याने परिभाषित करत आहे आणि भारतात यशस्वी ठरलेली ही संकल्पना जगभर पोहोचवत आहे.

मलाबार ग्रुपचे चेअरमन एम. पी. अहमद म्हणाले, हंगर फ्री वर्ल्ड हा मलाबार ग्रुपने राबवलेला सर्वात अर्थपूर्ण ईएसजी उपक्रम आहे. एक जबाबदार ज्वेलर म्हणून, आमची बांधिलकी केवळ व्यवसायापुरती मर्यादित नाहीतर आम्ही ज्या समुदायांची सेवा करतो, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आहे. या उपक्रमामुळे सकारात्मक बदललेले लाखो जीवन, आमच्या शाश्वत आणि समावेशक विकासाच्या ध्येयाची साक्ष देतात. इथिओपिया सरकारसोबत भागीदारी करताना, पुढील दोन वर्षांत ८,६४,००० अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक करण्यात येईल. आमचे उद्दिष्ट २०२६ च्या अखेरीस १०.००० मुलांना दररोज पोषणमूल्ययुक्त जेवण उपलब्ध करून देणे तसेच उत्कृष्ट शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करणे आहे.

मलाबार ग्रुपचे उपाध्यक्ष अब्दुल सलाम के.पी. म्हणाले, आपल्या स्थापनेपासूनच समुदाय विकास हा मलाबारच्या ब्रँड डीएनएचा एक महत्त्वाचा भाग राहिला आहे. हंगर फ्री वर्ल्ड उपक्रमातून आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे की रोजचे पौष्टिक आहार मिळाल्याने केवळ व्यक्तीचे नाही, तर संपूर्ण समुदायांचे आयुष्य बदलू शकतो. हा उपक्रम इथिओपियापर्यंत विस्तारण्याचे आमचे पाऊल म्हणजे उपासमार संपवणे आणि शिक्षणातील समानता निर्माण करण्याच्या जागतिक ध्येयाकडे वाटचाल करण्याचा आणखी एक टप्पा आहे. ज्या मुलांना आणि कुटुंबांना सर्वाधिक गरज आहे, त्यांच्या जीवनात दीर्घकालीन आणि स्पष्ट बदल घडवण्याची आमची बांधिलकी आहे.

इथिओपियामध्ये हंगर फ्री वर्ल्ड उपक्रमाचा विस्तार करण्यामागे प्रत्येक मुलाला, त्याची आर्थिक किंवा सामाजिक परिस्थिती काहीही असो, पौष्टिक आहार आणि दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे हे आमचे उद्दिष्ट आहे. हाच उज्वल भविष्यातला पाया आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात आम्ही ओरोमिया प्रदेशातील अदामा सिटी येथील ५ शाळांबरोबर काम करणार आहोत, जिथे सुमारे ११,००० मुले शिक्षण घेतात. शालेय पोषण कार्यक्रमाबरोबरच आम्ही इथिओपियामध्ये शिष्यवृत्ती, मेंटॉरशिप, डिजिटल साक्षरता, ग्रंथालय विकास आणि अशा अनेक उपक्रमांची अंमलबजावणी करू. इथिओपियाच्या सरकारच्या अमूल्य सहकार्याने, हा उपक्रम सर्वांगीण विकास आणि शाश्वत परिणाम देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतिक आहे, असे मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे शामलाल अहमद, व्यवस्थापकीय संचालक आंतरराष्ट्रीय ऑपरेशन्स, यांनी सांगितले.

ईसीजी (पर्यावरण, सामाजिक उत्तरदायित्व आणि सुशासन) हे १९९३ पासून मलाबार ग्रुपचे प्रमुख ध्येय राहिले आहे. ज्या-त्या देशात कंपनी कार्यरत आहे, तिथे हे मूल्य प्रत्यक्ष कृतीतून दाखवले जाते. आरोग्य, हंगर फ्री वर्ल्ड, घरे, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण संरक्षण ही या उपक्रमांची मुख्य लक्षवेधी क्षेत्रे आहेत. सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि संवेदनशील संस्था राहण्यासाठी मलाबार ग्रुप आपली ईसीजी उद्दिष्टे वेळोवेळी अधिक मजबूत करत आहे.

# सॅमसंग टीव्ही प्लसने टॉप क्रिएटर्ससोबत अद्वितीय कन्टेन्ट करार

**मुंबई, १४ नोव्हेंबर :** सॅमसंग टीव्ही प्लस या भारतातील आघाडीच्या फ्री अॅड-सपोर्टेड स्ट्रीमिंग टेलिव्हिजन (फास्ट) सर्विसने घरातील सर्वात मोठ्या स्क्रिनवर त्यांच्या विशेष FAST चॅनेल्सच्या स्ट्रिमिंगसाठी अव्वल जागतिक क्रिएटर्ससोबत सहयोग केला आहे.




भारतात लॉंच करण्यात आलेल्या सहा सर्वोत्तम चॅनेल्समध्ये मार्क रॉबरच्या पहिल्या समर्पित फ्री अॅड-सपोर्टेड स्ट्रीमिंग टीव्ही चॅनेलच्या जागतिक प्रीमियरचा समावेश आहे. सॅमसंग टीव्ही प्लस आता १० हून अधिक चॅनेल्स देते, जे भारतभरात १४ दशलक्षहून अधिक सॅमसंग स्मार्ट टीव्हींमध्ये उपलब्ध आहेत.

७१ दशलक्षहून अधिक सबस्क्रायबर्ससह माजी नासा अभियंता, नवप्रवर्तक, शिक्षणतज्ज्ञ आणि सर्वात प्रभावी क्रिएटर मार्क रॉबर जगभरातील टेलिव्हिजन प्रेक्षकांसाठी त्यांच्या विज्ञान, सर्जनशीलता व उत्साहाचे सिग्नेचर संयोजन देतात.

''माझा नेहमी विश्वास आहे की, विज्ञान व अभियांत्रिकी जिज्ञासूवृत्ती आणि सर्जनशीलतेसाठी फक्त फॅन्सी शब्द आहेत,'' असे मार्क रॉबर म्हणाले. ''हे चॅनेल जगभरातील अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत त्या उत्साहाचा प्रसार करते. तसेच अध्ययनाला धमाल करते, ज्यामुळे तुम्हाला काहीतरी वेगळे करावेसे वाटते.''

क्रिएटर चॅनेल्सची ही नवीन श्रेणी स्ट्रीमिंग सेवेवर शैलीला परिभाषित करणाऱ्या आवाजांची नवीन लाट आणते, ज्यामध्ये मिशेल खरे यांचे चॅलेंज अॅसेप्टेड, एपिक गार्डनिंग टीव्ही, द ट्राय गाईज, ब्रेव्ह वाइल्डरनेस आणि द सोनी गर्ल्स टीव्हीचा समावेश आहे.

हा अद्वितीय कन्टेन्ट करार सॅमसंग टीव्ही प्लसच्या व्यापक, जागतिक विस्तारीकरणाचा भाग आहे, जेथे ते जागतिक दर्जाच्या क्रिएटर्ससाठी प्रीमियम गंतव्य म्हणून टेलिव्हिजनच्या नवीन युगाला आकार देत आहेत आणि घरामध्ये मोठ्या स्क्रिनवर पाहिल्या जाणाऱ्या मनोरंजनाच्या स्तराला नव्या उंचीवर घेऊन जात आहेत.

''मार्क रॉबर यांच्या विज्ञान, सर्जनशीलता व जिज्ञासूवृत्तीच्या संयोजनाने जगभरातील लाखो व्यक्तींना प्रेरित केले आहे,'' असे सॅमसंग टीव्ही प्लसचे वरिष्ठ उपाध्यक्ष व जागतिक प्रमुख सालेक ब्रोडस्की म्हणाले. ''आमच्या वाढत्या क्रिएटर रोस्टरचा भाग म्हणून मार्क रॉबर टीव्ही पिढ्यांना एकत्र आणणाऱ्या आश्चर्याची सामायिक भावना सादर करते. आम्हाला मार्क यांचे स्वागत करण्याचा आणि सॅमसंग टीव्ही प्लसच्या माध्यमातून आमच्या क्रिएटर्सची व्यापक श्रेणी जगभरातील अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा आनंद होत आहे.''

## डायसन डील डेज: ब्लॅक फ्रायडेपूर्वी आकर्षक ऑफर्स मिळवा

**नागपूर, १४ नोव्हेंबर :** डायसन उत्पादने वर्षातील सर्वात आकर्षक ऑफर्ससह उपलब्ध आहेत. या खास ऑफर्स १४ ते २० नोव्हेंबर २०२५ दरम्यान डायसन डील डेज दरम्यान लागू असतील. डायसन डील डेज दरम्यान, डायसन डायसनच्या प्रगत तंत्रज्ञानावर २५,००० पर्यंत बचत देत आहे. डायसनच्या नवोपक्रमांवर या ऑफर्ससह, तुम्ही तुमचा घर आणि सौंदर्य अनुभव वाढवू शकता.

आकर्षक स्टाइल: बहुमुखी केसांची निगा राखण्याच्या साधनांसह सहज स्टाइलिंग

डायसनची आयकॉनिक हेअर केअर टूल्स तुम्हाला घरी सलूनसारखे लूक देतात. ही टूल्स सहज स्टाइलिंगसाठी आणि उष्णतेचे नुकसान न करण्यासाठी डिझाइन केलेली आहेत. ते स्लीक स्ट्रेट लॉक्सपासून ते मोठ्या कर्लपर्यंत प्रत्येक प्रकारच्या केसांना स्टाइलिंग करू शकतात. डायसन डील डेज दरम्यान ही स्टाइलिंग टूल्स अविस्मरणीय किमतीत खरेदी करता येतील:

डायसन एअररॅप आय.डी. मल्टी-स्टायलर आणि ड्रायर - डायसनच्या पहिल्या कनेक्टेड डिव्हाइससह तुमच्यासाठी तयार केलेल्या वैयक्तिकृत स्टाइल तयार करा. आता ४२,९०० मध्ये (सिरेमिक पॅटिना आणि टोपाझ)

डायसन एअरस्ट्रेट स्ट्रेटनर - हॉट प्लेट्स आणि उष्णतेचे नुकसान न होता, एकाच टप्प्यात वाळवणे आणि सरळ करणे यासह तुमच्या स्टाइलिंगमध्ये क्रांती घडवा. आता २९,९०० मध्ये (प्रुशियन ब्लू वगळता सर्व रंग)

डायसन कोरेल हेअर स्ट्रेटनर (ब्राइट कॉपर/ब्राइट निकेल) धावपळीच्या जीवनात केसांना कमीत कमी नुकसान होऊन हेअरस्टाईल करण्यासाठी योग्य. आता २९,९०० मध्ये

डायसन सुपरसॉनिक हेअर ड्रायर (प्रुशियन ब्लू/रिच कॉपर) सर्व प्रकारच्या केसांसाठी जलद वाळवणे आणि अचूक स्टाइलिंग. आता २४,९०० मध्ये.

स्वच्छ हवेत श्वास घ्या: उच्च घरातील एक्यूआय ला तोंड देण्यासाठी एअर प्युरिफायर्स

भारतीय शहरे, विशेषतः उत्तर भारत धोकादायक एक्यूआय पातळीशी झुंजत आहे. म्हणूनच, घरातील हवेची गुणवत्ता सुरक्षित ठेवणे खूप महत्वाचे बनले आहे. डायसन प्रगत एअर प्युरिफायर्स तुमच्या घरातील जागांचे संरक्षण करण्यासाठी आणि तुमच्या घराला ऍलर्जीन आणि प्रदूषकांपासून संरक्षण देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. हे प्युरिफायर्स एचईपीए ग्रेड फिल्टरेशन प्रदान करतात आणि तुमच्या कुटुंबासाठी स्वच्छ, निरोगी हवा देतात. डायसन प्युरिफायर कूल फॉर्मल्डिहाइड (टीपी०९) - हे अतिसूक्ष्म धूळ आणि ऍलर्जीन शोषून घेते. ते फॉर्मल्डिहाइडसह संभाव्य धोकादायक व्हीओसी नष्ट करते. आता ४९,९०० मध्ये.

हेडफोन्स रीमस्टर्ड: द अल्टिमेट लिसनिंग एक्सपिरीयन्स

हे ऑडिओफाइलसाठी बनवले आहे, जे सर्वोत्तम शोधतात. ते सर्वोत्तम दर्जाचे नॉइज कॅन्सलेशन आणि इमर्सिव्ह साउंड प्रदान करते. डायसन डील डेज दरम्यान ते अतुलनीय किमतीत उपलब्ध आहे. डायसन ऑनट्रॅक हेडफोन्स: ते ५५ तासांपर्यंत बॅटरी लाइफ आणि दिवसभर आरामासाठी कस्टमाइझ करण्यायोग्य कुशन आणि कॅप्ससह येतात. आता १९,९०० मध्ये.

# अदाणी सिमेंट टीएनएफडी स्वीकारणारी पहिली भारतीय सिमेंट कंपनी आहे

**अहमदाबाद, १४ नोव्हेंबर :** अंबुजा सिमेंट लिमिटेड आणि तिच्या उपकंपन्यांपासून बनलेली अदाणी सिमेंट, जी जागतिक स्तरावर ९वी सर्वात मोठी बांधकाम सामग्री समाधान प्रदाता आणि विविध अदाणी पोर्टफोलियोचा भाग आहे, भारतीय सिमेंट उद्योगात निसर्ग-संबंधित आर्थिक प्रकटीकरण (टीएनएफडी) च्या शिफारसींवर आधारित टास्कफोर्स स्वीकारणारी पहिली कंपनी बनली आहे. त्यामुळे निसर्ग-पॉझिटिव्ह व्यावसायिक परिवर्तनाला समर्थन देणाऱ्या जागतिक उद्योगातील निवडक लीडर्सच्या गटात तिचा समावेश झाला आहे. टीएनएफडीच्या शिफारसी स्वीकारून अदाणी सिमेंट निसर्ग-संबंधित जोखीमे आणि संधींची ओळख, मूल्यांकन, व्यवस्थापन आणि प्रकटीकरण करण्यासाठी वचनबद्ध आहे, ज्यामुळे शाश्वत उत्पादन क्षेत्रातील तिचे नेतृत्व आणखी मजबूत होईल. यासोबतच, भारतातील प्रतिष्ठित आणि विश्वासार्ह अंबुजा सिमेंट्स आणि एसीसी या ब्रँड्सपासून बनलेली अदाणी सिमेंट, टीएनएफडी फ्रेमवर्क स्वीकारणाऱ्या जगातील सात सिमेंट कंपन्यांपैकी एक बनली आहे.

अदाणी समूहाच्या सिमेंट व्यवसायाचे सीईओ विनोद बाहेती म्हणाले, आमच्याकडून टीएनएफडी फ्रेमवर्क स्वीकारणे हे निसर्ग-पॉझिटिव्ह विकास आणि हवामान नेतृत्वाच्या दिशेने अदाणी सिमेंटच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आमच्या उद्योगात टीएनएफडी-सरेखित प्रकटीकरणांसाठी वचनबद्ध असल्याचा आम्हाला अभिमान आहे, जे आमचा हा विश्वास दृढ करते की जबाबदार व्यवसाय ही दीर्घकालीन यशाची पायाभरणी आहे. ही बांधिलकी डीकार्बोनायझेशनमधील आमच्या अलीकडील प्रगतीवर आधारित आहे, ज्यामध्ये कूलब्रुकच्या रोटोडायनॅमिक हीटर (आरडीएच) तंत्रज्ञानाची जगातील पहिली व्यावसायिक तैनाती समाविष्ट आहे. आम्ही नेट-झिरोकडे जाणारी प्रगती वेगाने पुढे नेत आहोत, जैवविविधता वाढवत आहोत आणि आमच्या सर्व कार्यांमध्ये लवचिकता निर्माण करत आहोत. अदाणी समूहाच्या एकात्मिक परिसंस्थेद्वारे समर्थित नावीन्य, डिजिटलीकरण आणि नवीकरणीय ऊर्जा यांवरील आमचा भर, आम्हाला भारताच्या शाश्वत विकास उद्दिष्टांना समर्थन देत सर्व हितधारकांना अधिक चांगले मूल्य प्रदान करण्याच्या स्थितीत ठेवतो.

टीएनएफडी ही एक जागतिक, विज्ञान-आधारित पुढाकार आहे, जी संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम वित्त उपक्रम (यूएनईपी एफआय), संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी), वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड (डब्ल्यूडब्ल्यूएफ) आणि ग्लोबल कॅनोपी यांनी स्थापन केली आहे. हे कंपन्यांना धोरणात्मक निर्णय घेणे आणि कॉर्पोरेट रिपोर्टिंगमध्ये निसर्ग-संबंधित विचार एकत्रित करण्यासाठी मार्गदर्शन प्रदान करते.

अदाणी सिमेंट वित्त वर्ष २६ पासून टीएनएफडी-सरेखित शिफारसी औपचारिकपणे स्वीकारेल, ज्यामुळे पर्यावरणीय कामगिरीत तिची पारदर्शकता आणि जबाबदेरी वाढेल. हा निर्णय कंपनीच्या विद्यमान हवामान-जोखीम मूल्यांकन आणि प्रकटीकरण पद्धतींवर आधारित आहे, ज्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त फ्रेमवर्कशी सुसंगत आहेत. अदाणी सिमेंटने आधीच मजबूत ईएसजी मानके आत्मसात केली आहेत, ज्यात मोठ्या प्रमाणावर वनीकरण (७० लाखांपेक्षा अधिक झाडे लावली आहेत), जल व्यवस्थापन (१२ पट जल-धनात्मकता साध्य केली आहे) आणि उत्पादन स्थळे व ऑपरेशन्समध्ये जैवविविधता संरक्षण यांचा समावेश आहे.

अंबुजा सिमेंट्स आणि एसीसी विविध गृहसूचीबद्ध कमी-कार्बन सिमेंट आणि कॉंक्रीट बांधकाम उपाय प्रदान करतात, ज्यांच्या पोर्टफोलिओपैकी ८५% पेक्षा जास्त भाग मिश्रित हरित सिमेंटने बनलेला आहे. त्यांची प्रीमियम उत्पादने कार्बन फूटप्रिंट कमी करण्यास आणि शाश्वत बांधकाम परिसंस्था प्रोत्साहन देण्यास मदत करतात. अदाणी सिमेंटचे लक्ष्य वित्त वर्ष २८ पर्यंत ३०% एएफआर वापर आणि ६०% हरित ऊर्जा हिस्सा साध्य करणे आहे, ज्यामुळे जबाबदार संसाधन व्यवस्थापन आणि जैवविविधता संरक्षण या टीएनएफडीच्या तत्त्वांना थेट पुढे नेले जाईल.

अदाणी सिमेंटद्वारे टीएनएफडी स्वीकारणे हे भारतीय सिमेंट उद्योगासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे, जो पायाभूत सुविधा आणि राष्ट्रनिर्माणात निर्णायक भूमिका बजावतो. निसर्ग-संबंधित प्रकटीकरणाबाबत कंपनीचा सक्रिय दृष्टिकोन या क्षेत्रासाठी एक आदर्श निर्माण करतो आणि स्पर्धकांना जैवविविधता आणि हवामान बदलाबाबत लवचिकता प्राधान्य देण्यास प्रोत्साहित करतो. अदाणी सिमेंटचे व्यापक शाश्वत नेतृत्व हे यामध्येही दिसून येते की ती जगातील चार मोठ्या सिमेंट कंपन्यांपैकी एक आहे ज्यांचे SBTi मान्यताप्राप्त नेट-झिरो लक्ष्य आहे, तसेच IRENA अंतर्गत अलायन्स फॉर इंडस्ट्री डीकार्बोनायझेशन (एएफआयडी) मध्ये सामील होणारी जगातील पहिली सिमेंट निर्माता कंपनी आहे.

## दिव्य बोध आणि भावा-भावातील भावबंध: सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकिय मध्ये गणेश आणि कार्तिकिय मोठे होत आहेत

सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही पौराणिक मालिका आपल्या दिव्य कथानकाने प्रेक्षकांचे मन काबिज करत आहे. या मालिकेत भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेनु परीख) आणि त्यांची मुलं गणेश (एकांश कथुरिया) आणि कार्तिकेय (सुभान खान) यांच्या फारशा न ऐकलेल्या कथा बघायला मिळत आहेत.



या मालिकेत शिव परिवारातील नाते-संबंध, आव्हाने, विजय आणि मानवी भावनांची किनार असलेले त्यांचे दिव्यत्व प्रेक्षक अनुभवत आहेत.

आगामी भागांमध्ये, गणेश कार्तिकेयाला पुन्हा कैलासावर घेऊन येतो. येथे त्यांचा सामना हाहा (गुरु गोविंद), हूहू (सोहित सोनी) आणि तुंबरू (कुणाल सेठ) या तीन गंधर्वांशी होतो. या गंधर्वांकडे गणेश, शिव, पार्वती आणि ब्रह्माचे रूप दाखवणाऱ्या पाच मूर्ती असतात. ते कार्तिकेयाचा समावेश त्यात करत नाहीत, कारण ते त्याला देवता मानत नाहीत. ते त्याला केवळ सेनापती मानतात. हे पाहिल्यानंतर, गणेश हलकेच हस्तक्षेप करतो आणि मग शिव आणि ब्रह्मदेव त्या गंधर्वांना कार्तिकेयाच्या दिव्यतेचा बोध करून देतात. आपली चूक उमगल्यावर ते मनःपूर्वक माफी मागतात. दरम्यान, मूषक राज पराशर ऋषींच्या (मनोज कोल्हटकर) आश्रमात उच्छाद मांडतो. त्यामुळे पुन्हा गणेशाला मध्ये पडावे लागते. गणेश केवळ ज्ञानाची देवता असल्याचे मानून त्याचे दिव्यत्व न ओळखता तो गणेशाला बुद्धीच्या लढाईचे आव्हान देतो. पण अर्थात, गणेश प्रत्येक प्रश्नाचे अगदी सहजपणे उत्तर देतो. ते पाहून मूषक वरमतो. आपली चूक आणि गणेशाची सुजाणता ओळखून मूषक पश्चात्ताप करतो आणि गणेशाने आपल्याला त्याचे वाहन बनवावे अशी इच्छा व्यक्त करतो. या घटनाक्रमात, हे दोन्ही भाऊ गणेश आणि कार्तिकेय आपापल्या अनुभवातून घडत आहेत आणि एक देवता म्हणून पूर्णतेकडे वाटचाल करत आहेत.

'गणेश कार्तिकेय' मालिकेत गणेशाची भूमिका करणारा एकांश कथोरिया म्हणतो, या कथानकात गणेशाच्या प्रवासातील एक खूप गोड आणि मजेदार भाग दिसतो. गणेश कोप न करता शांतपणे आपल्या बुद्धीचातुर्याचा उपयोग करून समस्या सोडवताना दिसतो. मूषक राज सोबतची दृश्ये करताना खूप मजा आली. त्यात खूप चातुर्य होते आणि खूप बोधही होता. गणेशाला कसा आपला उद्देश समजू लागला आहे, हे या कथानकांमधून दिसते. दयाळूपणा आणि ज्ञान यामुळे तुम्ही किती मोठे होऊ शकता हे देखील यातून समजते.

'गणेश कार्तिकेय' मालिकेत कार्तिकेयाची भूमिका करणारा सुभान म्हणतो, हा कथाभाग करताना खूपच मजा आली, कारण यातून दाखवले आहे की कार्तिकेय कसा मोठा होत आहे आणि देव होण्यासाठी कसे असले पाहिजे हे शिकतो आहे. सुरुवातीला लोकांना त्यांचे महत्त्व समजत नाही पण हळूहळू, तो खरा कोण आहे हे त्यांना समजते. या कथेत कार्तिकेय आणि गणेशातील जे नाते दाखवले आहे, ते खूप हृदयस्पर्शी आहे. भाऊ म्हणून ते एकमेकांना आधार देतात आणि पूरक ठरतात.

## बालक दिनानिमित्य अंगणवाडीतील चिमुकल्यांना पाटी लेखन वाटप

**अमरावती १४ नोव्हेंबर :** आधुनिक भारताचे शिल्पकार, शांतिदूत तसेच देशाचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा नोव्हेंबर हा जयंती दिवस देशभरात बालक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्य स्थानिक रमाबाई आंबेडकर नगर अंगणवाडी केंद्र क्र. १०५ येथे बालकांना पाटी -लेखनचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार अमित तायडे, तसेच अंगणवाडी सेविका सविता राहाटे, अंगणवाडी मदतनीस मेघा बनसोड, पालक प्रतिनिधी सौ. सुनीता विष्णू साबळे, काजलताई इंगळे, सामाजिक कार्यकर्ता राहुल तायडे, वेदांत ततरपाळे, सुरज टेंबले आदी प्रामुख्याने उपस्थित होते. शाळा हे विद्यार्थ्यांच्या भवितव्याला दिशा देणारे एक केंद्रस्थान असले तरी शालेय जीवनाची खरी पायाभरणी हि अंगणवाडी पासून सुरु होते. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी सुसंस्कार व मूल्य शिक्षण आवश्यक असल्याने त्याचे बीजारोपण हे अंगणवाडीपासून केल्या जाते. म्हणूनच अंगणवाडी म्हणजे बालकांमध्ये सुसंस्कार घडविण्याचे संस्कार केंद्र असल्याचे प्रतिपादन पत्रकार अमित तायडे यांनी केले. अंगणवाडी केंद्रात बालकांना सुविचार, बोधकथा, बडबड गीते, नाते ओळख, रंग पसंती, बौद्धिक खेळ, अशा प्रकारे संस्कारिक शिक्षण देऊन त्यांच्या शारीरिक व मानसिक अभिक्षमतांना विकास साधला जातो. आज त्यांना पाटी -लेखन उपलब्ध झाल्याने त्यांना अक्षर ओळख व लेखन-कला बाबतचे ज्ञान सुद्धा देणे सोयीचे ठरणार असल्याचे मनोगत सुद्धा पत्रकार अमित तायडे यांनी व्यक्त केले. देशातील थोर पुरुष चाचा नेहरू यांना मुले आणि फुले आवडत होती. त्यामुळे त्यांच्या जयंती दिनी अंगणवाडी केंद्रात बालक दिन साजरा करण्यात आल्याने बालकांमध्ये एक आनंद दिसून आला. तदनंतर सर्व बालकांना खाऊचे वाटप सुद्धा करण्यात आले.

## 'पुष्पा इम्पॉसिबल' मध्ये राशी आणि ऋषभच्या लग्नाला पुष्पा सहमत होईल का ?

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल या मालिकेने नुकताच ७ वर्षांचा लीप घेत नवीन पर्वाची सुरुवात केली आहे. प्रेक्षक आता पुष्पा (करुणा पांडे) हिला वकिलाच्या नव्या व्यावसायिक प्रवासात पाहत आहेत. स्वतःचा मार्ग निर्माण करण्यासाठी ती निर्धारपूर्वक प्रयत्न करत आहे, तर दुसरीकडे तिच्या कुटुंबातील नाती अनपेक्षित वळण घेत आहेत. जीवनातील प्रत्येक अडथळ्यावर मात करण्याचा तिचा अढळ निर्धार हा एक आशेचा आणि योग्य गोष्टींसाठी उभे राहण्याच्या सामर्थ्याचा प्रेरणादायी प्रवास आहे.



पुढील भागांमध्ये छोटू चहावाल्याच्या (रामदेव मिश्रा) आजारपणाविषयीच्या तपासादरम्यान पुष्पाला एक धक्कादायक सत्य समजते की, त्या वस्तीतल्या अनेक लोकांना तेथील बेकायदेशीर कारखान्याच्या दूषित पाण्यामुळे त्रास झाला आहे. या गोंधळात पुष्पाला आपली मुलगी राशी (अक्षया हिंदळकर) आणि ऋषभ (श्रेय मराडिया) यांच्या नात्याविषयी समजते. त्यामुळे तिच्या घरात व आयुष्यात एक भावनिक वादळ येते. राशीला वाटते की, तिच्या आईने आयुष्यात तिला कधीच भावनिक साथ दिली नाही. आपले वागणे आईच्या विरोधात असले तरी ऋषभशीच लग्न करायचे, असे राशी ठरवते.

पुष्पा आणि ऋषभच्या पालकांमधील ताणलेले संबंध या परिस्थितीला आणखी गुंतागुंतीचे बनवतात. आता प्रश्न असा आहे की, पुष्पा राशी आणि ऋषभच्या लग्नाला संमती देईल का?

राशीची भूमिका साकारणारी अभिनेत्री अक्षया हिंदळकर म्हणते, या सात वर्षांत राशी मोठी झाली आहे आणि त्यासोबत तिला सत्य बोलण्याचं धैर्य आलं आहे. ती तिच्या आईवर मनापासून प्रेम करते, पण त्यांच्या नात्यात आलेल्या दुराव्यामुळे तीही दुखावली आहे. पुष्पासोबतचा संघर्ष फक्त ऋषभबद्दलचा नाही, तर वर्षानुवर्षे साचलेल्या व न ऐकल्या गेलेल्या भावनांबद्दलचा आहे. राशी अशा वळणावर उभी आहे, जिथे तिला ठरवावं लागणार आहे की, आपल्या प्रेमासाठी लढायचं का कुटुंबाच्या अपेक्षांना मान द्यायचा. हे भावनिकदृष्ट्या तीव्र दृश्य साकारताना मला खूप आव्हानात्मक, पण समाधानकारक अनुभव आला. मला आशा आहे की, प्रेक्षक राशीच्या प्रवासाशी जोडले जातील आणि कुटुंबातील मोकळ्या संवादाचं महत्त्व ओळखतील.


**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO: 2025_DOAWB_1245831**

**Supply, Installation, Testing and Commissioning of Fully Automatic Rice Mill 2 TPH**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Adasi Kisan Farmer Producer Company Ltd., At Adasi, Taluka - &, District - Gondia is one of the beneficiaries under the inviting online bids on and project **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org, in** tender and procurement section. The last date for submission of online bid is **08/12/2025 up to 02:00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project, Dist. - Gondia**


# शब्दकोडे क्रमांक २२६८



**आडवे शब्द :-**
१) बोलकी बाहुली कार्यक्रमातील रामदास पाध्ये यांच्या बाहुल्याचे नाव
५) जुगार
६) विश्रांती
८) अथवा, किंवा
९) लोणच्यातील द्रवमसाला
१०) मीठ
१२) *** निर्यात
१४) मनाची फिरणारी इच्छा
१६) राक्षसी, डाकीण
१७) कपाळ
१८) वैमानिकाचे वाहन
२०) पोर्णिमाच्या विरुद्ध
२१) सर, हार
२३) पंख
२४) अग्नी
२६) आश्चर्य
२७) एक आदिवासी जमात
२९) एक चतुर्थांश भाग
३०) राक्षस
३१) चणचण, न्यूनता
३४) जिंकलेला (इं.)
३६) घागरा
३७) चड्डा
३८) पावसाची झड
४०) युद्ध
४२) केशवृद्धीची सुगंधी वनस्पती
४४) माल साठविण्याची जागा
४५) चांगली वागणूक
४८) टपाल (इं.) ५१) हत्ती
५३) बाजाराचा
५५) झाडाची पाने, काटक्या इ.
५७) बोकड
५९) म्हैस, शिवाय
६१) पातळ खांब
६२) भगर
६३) माकडातील एक प्रकार
६४) सरळ लांब बांबू
६६) कर्णेंद्रिय
६९) राखेचा ढीग
७२) दुबळा, गरीब
६५) मासा
७३) विणून कापड तयार करण्याचे साधन
७४) राजसूख
७६) तरतरी आणणारे उष्ण पेय
७७) समुदाय
७८) कोवळ्या दुधाचा पदार्थ
७९) संगीतातील एक रागिणी, अमर *** एक जुना मराठी चित्रपट

**उभे शब्द :-**
१) भारी किमतीचा
२) सरपणाचे दुकान
३) टिंगल
४) अरण्यवास
५) च्यासह
६) सिंहाच्या मानेभोवतीचे केस
७) रात्र
११) चामखीळ
१२) नभ
१३) पुष्कळ
१५) यज्ञात टाकण्याचे इंधन
१६) पेरणी
१९) पुरुष
२१) श्रीमंत
२२) दह्याचे पातळ पेय
२४) अखेर, शेवट
२५) किंचित छोटा
२६) लग्नाचा मुलगा
२७) पत्ता
२८) कणीदार पीठ
२९) पातक
३२) धमनी
३३) हत्ती
३५) दारुचा एक प्रकार
३९) निकट, आजूबाजूस
४१) आवड, धातूचा द्रव
४३) तह, ऐक्य, सलोखा
४६) अवस्था
४७) पर्वत
४९) अर्धांगवायू
५०) शेगावचा एक प्रसिद्ध खाद्यपदार्थ
५२) एक गळीत धान्य
५३) फुलांची माळ
५४) पृथ्वी
५६) पवित्र
५७) दुष्काळ
५८) सोन्याचा धागा
६०) फणसातील खाद्यभाग
६५) निर्भेळ
६६) धातूची कड घासण्याचे खडबडीत हत्यार
६७) शरीर
६८) देखावा, सजावट
७०) उट्टे, सूड
७१) कोवळी फांदी
७३) महिना
७५) छाती

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# बालांगण

## तलावांचं शहर उदयपूर

सफर शहरांची

**दो**स्तांनो, राजस्थानमध्ये उदयपूर नावाचं सुंदर शहर आहे. उदयपूर ही एके काळी मेवाड साम्राज्याची राजधानी होती. महाराणा उदयसिंहने हे शहर वसवलं. त्यामुळे या शहराला उदयपूर हे नाव पडलं. उदयपूर हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. उदयपूरमध्ये बरेच तलाव आहेत. हे शहर अरवली पर्वतरांगांनी वेढलेलं आहे. उदयपूरमध्ये बऱ्याच ऐतिहासिक वास्तू आहेत. पिचोला तलाव, उदयपूर सिटी पॅलेस, कुंभलगड किल्ला ही उदयपूरमधली प्रसिद्ध पर्यटनस्थळं आहेत.

उदयपूरला तलावांचं शहर असंही म्हणतात. या तलावांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या शहरातले तलाव एकमेकांशी जोडलेले आहेत. त्यामुळे इथल्या पाण्याची पातळी कधीच कमी होत नाही. याच कारणामुळे उदयपूरचं वातावरणही थंड असतं. फतेहसागर, जयसमंद, बढी, दूधतलाई हे तलावही खूप प्रसिद्ध आहेत. इथल्या तलावांमध्ये नौकाविहाराचा आनंद लुटता येतो.

इथल्या पिछोला नावाच्या तलावात लेक पॅलेस नावाचं हॉटेल आहे. हे हॉटेल खूप सुंदर आहे. इथल्या कुंभलगड किल्ल्याची निर्मिती राणा कुंभाने केली होती. कुंभलगडाची भिंत खूप लांब आहे. चीनची भिंत जगातली सर्वाधिक लांबीची भिंत आहे. या भिंतीची गणना जगातल्या सात आश्चर्यांमध्ये केली जाते. त्यानंतर कुंभलगडच्या भिंतीचा क्रमांक लागतो, असं म्हणतात. ही जगातली दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब भिंत आहे. जयसमंद हा कृत्रिम तलाव आशिया खंडातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा कृत्रिम तलाव आहे. उदयपूर हे खूप शांत शहर आहे. त्यामुळे या शहराला एकदा तरी भेट द्यायला हवी.





## अनोखे वाद्य सरोद

ओळख वाद्यांची

**स**रोद हे भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अत्यंत महत्त्वाचे तंतुवाद्य आहे. याचा स्वर गंभीर आणि ध्यानसाधनेसारखा असतो. सरोदचा उगम अफगाणिस्तानातील रुबाब या वाद्यापासून झाल्याचे मानले जाते. अठराव्या शतकात अफगाणी रुबाब भारतात आला. त्यात काही बदल करून सरोदाची निर्मिती झाली. सरोद लाकडापासून बनवली जाते. त्याची ध्वनीपेटी धातूपासून बनवली जातेकिंवा प्राण्यांच्या कातड्याने झाकलेली असते.सरोदला साधारण १७ ते २५ तारा असतात. त्यापैकी काही मुख्य तारांवर राग वाजवला जातो. इतर तारा झंकारासाठी आणि तालासाठी वापरल्या जातात. सरोदला पट्ट्या नसतात. त्यामुळे बोटांच्या नखांनी तारा वाजवल्या जातात. त्यातून मींड किंवा गोड सरकते सूर तयार होतात. सरोदच्या तारा जवा नावाच्या पिकने वाजवल्या जातात. डावा हात तारांवर सरकवून स्वर नियंत्रित केले जातात. सरोदचा वापर प्रामुख्याने हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील राग सादर करण्यासाठी केला जातो. त्यात आलाप, जोड, झाल व गट अशा टप्प्यांतून रचना सादर केली जाते. सरोद एकल वादनासाठी तसेच जुगलबंदीसाठीही वापरले जाते. सरोद म्हटले की पहिले नाव येते ते उस्ताद अमजद अली खान यांचे. त्यांच्याशिवाय उस्ताद अली अकबर खान, उस्ताद हाफिज अली खान यांच्या घराण्यानेही सरोद परंपरेला मोठे योगदान दिले आहे. सरोद भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अनमोल रत्न मानले जाते.




## पर्याय व्होकेशनल अभ्यासक्रमांचा

कोण होणार?

**दो**स्तांनो, आता करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत डॉक्टर, इंजिनिअर, एमबीए, सीए, सरकारी नोकरी, बँकिंग या क्षेत्रांकडेच विद्यार्थ्यांचा कल असायचा पण आता व्होकेशनल म्हणजे व्यावसायिक अभ्यासक्रमांचं आकर्षण वाढताना दिसत आहे. पारंपरिक अभ्यासक्रमांऐवजी वेगळ्या वाटा निवडण्याकडे अनेकांचा कल असतो. बारावी किंवा पदवीनंतर अशा अभ्यासक्रमांची निवड करून चांगलं करीअर करता येतं. अशा काही पर्यायांविषयी...

▶ परदेशी भाषा शिकून तुम्ही विविध क्षेत्रांमध्ये मुशाफिरी करू शकता. नोकरीतही परदेशी भाषेचा लाभ होऊ शकतो. पर्यटनाच्या क्षेत्रात चांगला वाव मिळू शकतो. तसंच तुम्ही दुभाषक म्हणूनही काम करू शकता. लेखन क्षेत्रात करीअर करू शकता.



▶ हॉटेल मॅनेजमेंटचा चांगला पर्याय तुमच्यापुढे आहे. खवय्ये असाल किंवा स्वयंपाक येत असेल तर या क्षेत्रात जाता येईल.

▶ ट्रॅव्हल आणि टूरिझमचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पर्यटनाची हौस भागवू शकता. यानंतर सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात नोकरी करता येईल. पुरेशा अनुभवानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करता येईल.

▶ सध्या वेगवेगळ्या प्रकारची पादत्राणं तयार केली जातात. प्लास्टिक, रबर, ताग तसंच इतर साहित्य वापरून पादत्राणांची निर्मिती केली जाते. फुटवेअर डिझायनिंग हा करीअरचा उत्तम पर्याय ठरू शकतो.

▶ कलाक्षेत्रात रस आणि कल्पकता असल्यास टेक्सटाईल डिझायनिंग, टूल अँड डाय मेकिंग, टेक्सटाईल डिझाइन, फॅशन डिझाईन, इंटिरिअर डिझाईन अशा पर्यायांकडे वळता येईल.

## दक्षिणगंगा कावेरी

जीवनदायिनी नदी

**का**वेरी दक्षिण भारतातील अत्यंत महत्त्वाची नदी आहे. तिचा उगम कर्नाटक राज्यातील कोडगू जिल्ह्यातील ब्रह्मगिरी टेकड्यांमधून होतो. कावेरी नदीची लांबी साधारण ८०५ किलोमीटर आहे. ती कर्नाटक आणि तमिळनाडू या राज्यांतून वाहते. शेवटी बंगालच्या उपसागराला मिळते. धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या खूप महत्त्वाची असल्यामुळे कावेरी नदीला 'दक्षिणगंगा' म्हटले जाते. कावेरी नदीचा प्रवास खूप सुंदर आहे. ती डोंगर, दऱ्या, जंगल आणि मैदानांतून वाहत जाते. या प्रवासात हरंगी, हेमावती, शिम्शा, भवानी आणि अमरावती यासारख्या अनेक उपनद्या तिला मिळतात. पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी कावेरी नदीवर अनेक धरणे आणि कालवे बांधले गेले आहेत. कृष्णराज सागर धरण, मेट्टूर धरण ही महत्वाची धरणे आहेत. या धरणांमुळे केवळ शेतीसाठीच नव्हे तर पिण्यासाठी आणि वीज निर्मितीसाठीही पाणी उपलब्ध होते. धार्मिकदृष्ट्या कावेरी नदीला फार मोठे स्थान आहे. कावेरीला देवी मानले जाते. कावेरीच्या तीरावर अनेक धार्मिक उत्सव आणि मेळावे भरवले जातात. तिरुचिरापल्ली, श्रीरंगम, तलाकावेरी, मयिलाडुथुराई यांसारखी शहरे कावेरीच्या काठी आहेत. कावेरीला पवित्र मानून तिच्या काठावर स्नान व पूजा केली जाते. कर्नाटक आणि तमिळनाडू या दोन्ही राज्यांसाठी कावेरी ही जीवनरेखा आहे. परंतु आज कावेरी नदीसमोर प्रदूषण, जास्त पाणी उपसा आणि हवामानातील बदल ही आव्हाने आहेत. शहरांमधील सांडपाणी, कारखान्यांचा कचरा आणि प्लास्टिक यामुळे नदीचे पाणी दूषित होत आहे. त्यामुळे कावेरी नदीचे रक्षण करणे आणि तिचे पाणी शुद्ध ठेवणे आवश्यक आहे.



## हॅलोविनची गोष्ट

आयरिश लोककथा

**आ**यर्लंडमधल्या क्लोव्हरविल नावाच्या एका छोट्याशा गावातली गोष्ट. हॅलोविनचा दिवस होता. सगळीकडे भोपळ्याचे दिवे लावले होते. कोळ्याच्या जाळ्यांची आणि चेटकिणीच्या मुखवट्यांची सजावट केली होती. मुले रंगीबेरंगी भुतांचे कपडे घालून घरोघरी जात होती. त्या गावात एक घर होते. तिथे मिसेस मॉर्गन राहायच्या. सगळ्या मुलांना त्यांची भीती वाटायची. कुणी तिकडे गेले की दरवाजा आपोआप बंद व्हायचा. आतून हसण्याचा आवाज यायचा. हू हू हू!



मुले पळतच पुढच्या घरात जायची. मिसेस मॉर्गनच्या घरापाशी कुणीच थांबायचे नाही. लिअमला त्या घराबद्दल खूप कुतूहल वाटायचे. त्या दिवशी लिअम मुळीच ऐकेना. मी तिला भेटणारच! ती जर भूत असेल, तर मी तिला माझ्या गोळ्या देऊन टाकेन! सगळे मित्र हसले. पण लिअम टॉर्च घेऊन त्या घरात गेला. आत गुडुप अंधार होता. कोळ्याची जाळी होती. टेबलावर खूप जुने कपकेक्स ठेवले होते. अगदी दगडासारखे कडक!

अचानक त्याला मागून कोणी तरी म्हणालं, अरे माझे कपकेक्स चोरतोस काय?



लिअम घाबरून वळला, तर एक आजीबाई मोठ्ठी टोपी घालून, चमकदार मोजे आणि हॅलोविनचा एप्रन घालून उभी होती! मी भूत नाही. पण दरवर्षी हॅलोविनला मी शूर मुलाची वाट बघते. मला वाटते, की कुणीतरी शूर मुलगा येईल आणि मी त्याला भरपूर खाऊ देईन !

लिअमला आनंद झाला. त्याने त्याच्या सगळ्या मित्रांना बोलावलं. आजीबाईंनी मुलांच्या डोक्यावर चॉकलेट्स आणि गोळ्यांचा पाऊसच पाडला. त्या दिवसापासून क्लोव्हरविलमध्ये मिसेस मॉर्गनच्या घराला कुणी घाबरत नाही. मिसेस मॉर्गन आणि मुले मिळून गाणी गातात. भोपळे सजवतात आणि मजा करतात.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) व्हॉलीबॉलचा जन्म कोणत्या देशात झाला?
२) झुंबा काय आहे?
३) दिवसा चंद्रावरचं तापमान कमी असतं का जास्त?
४) पहिल्या महायुद्धाची सुरूवात कधी झाली?
५) आईस हॉकीच्या संघात किती खेळाडू असतात?
६) हवेची गती मोजण्यासाठी कशाचा वापर केला जातो?
७) एलपीजी हे कोणत्या दोन वायूंचं मिश्रण असतं?
८) जगातला सर्वात उष्ण खंड कोणता?
९) जगातला सर्वात लोकप्रिय खेळ कोणता?
१०) पाब्लो पिकासो कोण होता?

उत्तरं : १) अमेरिका २) नृत्य प्रकार ३) जास्त ४) १९१४ ५) सहा ६) ॲनिमोमीटर ७) प्रोपेन आणि ब्युटेन ८) आफ्रिका ९) फुटबॉल १०) चित्रकार

## ठिपके जुळवा



## अशी बनते तुमची आवडती जेली...

फन टाईम

**छो**ट्या दोस्तांनो, जेली हा प्रकार बराच लोकप्रिय आहे. महाराष्ट्रात महाबळेश्वरमध्ये मोठ्या प्रमाणावर जेली तयार होते. ही जेली मस्त लागते. गोल आकाराची, रंगीबेरंगी जेली पाहताच खावीशी वाटते. डेझर्टसोबतही जेली येते. अमेरिकेत जेलीला जेल–ओ असं म्हटलं जातं. तापमानानुसार जेलीचा आकार बदलत जातो. ० ते २० अंश सेल्सियस तापमानात जेली सेट होते. पण हे तापमान थोडंसं वाढलं तरी जेली वितळायला लागते. तापमान कमी झाल्यावर पुन्हा घट्ट होते. जेली सेट करण्यासाठी कोणत्या घटकाचा वापर केला जातो, हे तुम्हाला माहित आहे का? यासाठी जिलेटिनचा वापर केला जातो. जिलेटिन हा जेल बनवणारा घटक आहे. प्राण्यांच्या शरीरातल्या टिश्यूंमध्ये सापडणाऱ्या कोलाजन नामक प्रथिनांचा वापर करून जिलेटिन तयार केलं जातं. प्राण्यांची त्वचा किंवा हाडं पाण्यात उकळल्यानंतर जिलेटिन तयार होतं. प्राण्यांच्या टिश्यूंपासून कोलाजनचे तंतू वेगळे होतात. त्यांची पाण्यासोबत प्रक्रिया घडते आणि जिलेटिन तयार होतं. अगदी एक टक्का कोलाजन पाण्यात वितळवल्यानेही जिलेटिन तयार होऊ शकतं.

जिलेटिनमध्ये प्रथिनांची मोठी साखळी असते. गरम पाण्याशी संपर्क आल्यानंतर त्यांचं रूपांतर सूक्ष्म तंतूंमध्ये होतं. हे तंतू पाण्यातल्या सूक्ष्म कणांना स्वतःकडे आकर्षित करतात. यामुळे पाण्यातल्या सूक्ष्म कणांची संख्या कमी होते. हे मिश्रण थंड झाल्यानंतर पाणीयुक्त सूक्ष्म कण एकमेकांवर आदळतात आणि गुंतून बसतात. उरलेलं पाणी प्रथिनांच्या तंतूंमध्ये एकत्र बांधलं जातं आणि या मिश्रणाचं रूपांतर जेलमध्ये होतं. मार्शमॅलो आणि आईसक्रीममध्येही जिलेटिनचा वापर केला जातो. आजघडीला जिलेटिनऐवजी स्टार्च आणि पेक्टिनचा वापर करूनही पदार्थांना घट्टपणा दिला जातो. स्टार्च आणि पेक्टिन हे साखरेचे प्रकार आहेत. त्यांना गुंतागुंतीची कर्बोदकं असंही म्हटलं जातं.



### दोस्त हे मस्त

#### पर्शियन मांजर



मुलांनो, कुत्र्यांप्रमाणे मांजराच्याही वेगवेगळ्या प्रजाती असतात. यापैकी एक म्हणजे पर्शियन प्रजातीचं मांजर. हे मांजर खूप गोंडस असतं. त्याला भरपूर केस असतात. पर्शियन मांजर खूप महाग असतं. मांजराच्या या प्रजातीला बरीच मागणी असते. पर्शियन मांजरांची खूप काळजी घ्यावी लागते. त्यांच्याकडे नीट लक्ष द्यावं लागतं. पर्शियन मांजर १० ते १७ वर्षांपर्यंत जगतं. या मांजराचा थाट राजेशाही असतो! पर्शियन मांजर खूप खेळकर आणि प्रेमळ असतं.

### खादाडी

#### पौष्टिक पालक रायता



मुलांनो, थोडे आरोग्यदायी पदार्थ खाणंही गरजेचं आहे. म्हणूनच पालक रायता बनवून बघा. यासाठी दोन कप दही, दोन कप बारीक चिरलेला पालक, पाव चमचा लाल तिखट, अर्धा चमचा जिरेपूड, अर्धा चमचा साखर, अर्धा चमचा मिरपूड असं साहित्य घ्या. मीठ, दोन चमचे तेल, थोडी मोहरी आणि कढीपत्ता असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. त्यात जिरं घाला. यात पालक घालून परतून घ्या. पालक थोडा शिजू द्या. मग गॅस बंद करा. आता एका भांड्यात दही, जिरेपूड, लाल तिखट, मिरपूड आणि मीठ घालून हलवून घ्या. आता छोट्या भांड्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर मोहरी घाला. मग कढीपत्ते घाला. हा तडका दह्यात घाला. मग शिजवलेला पालक घाला. तुमचा पालक रायता तयार आहे.

### स्टडी टिप्स

#### मेंदूला द्या आराम



मुलांनो, परीक्षेच्या काळात तुम्हाला टीव्ही बघू दिला जात नाही. जास्त वेळ टीव्ही बघू नका, असंही सांगितलं जातं. टीव्ही बघण्यापेक्षा अभ्यास करणं गरजेचं असलं तरी दिवसभरात थोडा वेळ म्हणजे तासभर टीव्ही बघायला हरकत नाही. आपल्या आवडीचा कार्यक्रम बघितल्यावर मेंदू ताजातवाना होतो आणि तुम्ही अधिक जोमाने अभ्यास करू शकता. त्यामुळे तुम्ही अगदी थोडा वेळ टीव्ही बघू शकता. यामुळे मेंदूला आराम मिळू शकतो.

### योगा टाईम

#### करा मर्कटासन



मुलांनो, तुम्हाला वर्गात बराच काळपर्यंत बसावं लागतं. तुम्ही घरी बसून अभ्यास करता. शिवाय स्मार्टफोनमुळे मैदानी खेळांचं प्रमाणही कमी झालं आहे. यामुळे अगदी लहान वयात पाठदुखी, खांदेदुखीसारख्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत. म्हणूनच तुम्ही मर्कटासन करायला हवं. या आसनामुळे शरीर लवचिक होतं. पाठीच्या कण्याला आराम मिळतो आणि पाठदुखीचा त्रास कमी होतो.

# बिहारच्या निकालाने एनडीएची ताकद दुपटीने वाढली
# काँग्रेस नेतृत्व जनतेला मान्य नाही : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



केंद्र सरकार मजबूत आहेच पण आजच्या निकालाने आमचे एनडीए मजबूत होईल. एनडीएने सर्वांना मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. आजच्या निकालाने एनडीएची ताकद वाढलेली आहे. आम्ही एनडीए म्हणून देशभरात जात आहोत आता २०४७ पर्यंत आमचे सरकार केंद्रात आणि राज्यात राहील, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, बिहार निवडणुकीचा देशभरातील निवडणुकीवर परिणाम होणार आहे.एनडीएवर जनतेचा विश्वास आहे. महाराष्ट्रात देखील आम्ही ५१ टक्के घेत जागा जिंकणार आहोत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्रातील जनतेचा सुद्धा डबल इंजिन सरकारवर विश्वास आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आमचा विजय पक्का आहे. महाराष्ट्र क्रमांक एक करण्याचा देवेंद्र फडणवीस यांचा संकल्प आहे त्याला जनता साथ देईल.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसचे उरलेले लोक पक्षात रहावे, पक्ष किंचित होत चालला आहे तो किमान तसा तरी रहावा आणि राहुल गांधींचे (बाबांचे) नेतृत्व कसे तरी जिवंत ठेवायचे यासाठी काँग्रेसकडून प्रयत्न केले जातील. जनतेचा कल पाहिला आणि राहुल गांधी विदेशात निघून गेले. राहुल गांधी आणि काँग्रेसचे नेतृत्व टिकवण्यासाठी हे लोकं पुन्हा एकदा EVM च्या नावाने रडतील असा टोला बावनकुळेंनी लगावला आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ज्यांनी ज्यांनी मतदारांवर शंका उपस्थित केले ते जनतेला पटत नाही. आम्ही जेव्हाही हरलो तेव्हा एश्ट वर आरोप केला नाही. पण काँग्रेसकडून केवळ आरोप केले जातात. काँग्रेसवाले हरल्यावर विचार करत नाही पराभव झाला की राहुल गांधी परदेशात निघून जातात आणि पुन्हा EVM आणि मतचोरी झाली असे म्हणतील असा टोला बावनकुळेंनी लगावला आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, बिहारची जनता ही विकासाच्या बाजूने आहे. त्यांना डबल इंजिन सरकारवर संपूर्ण विश्वास आहे. हे सरकार बिहारचा विकास करु शकते म्हणून जनतेने विश्वास दाखवत एनडीएला मतदान केले आहे. आश्वासन पाळणारा पक्ष म्हणून जनतेने बिहारमध्ये आम्हाला मतदान केले आहे. मतदार यादीमध्ये अनेकांची नावे दुबार आहे ती बदलली गेलीच पाहिजे. पण राहुल गांधींनी जे मतचोरी म्हटले तसे काहीच नाही. राहुल गांधी यांनी कधीही विकसीत बिहारचा मुद्दा घेतला नाही, पण एनडीएकडून मात्र कायम विकसीत बिहारच्या मुद्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, त्यासाठी जनतेने एनडीएला कौल दिला आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, बिहारमध्ये एनडीएला मोठे बहुमत मिळताना दिसून येत आहे. देशातील १४० कोटी जनता ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामागे उभी झाली आहे. काँग्रेस पक्ष हा रोजच कमकुवत होत आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाला देशातील जनतेची मान्यता नाही. केवळ कार्यकर्ते, पक्ष आणि आपले राजकारण टिकवण्यासाठी मतदार यादीवर दोष देत वेळकाढूपणा काँग्रेसकडून सुरू आहे. त्यांच्याकडे विकासाचा एकही मुद्दा नाही म्हणून जात, धर्म, पंथाचा विषय काढत राजकारण करण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. यामुळे त्यांच्या बुडणाऱ्या जहाजावर कुणी बसायला तयार नाही. बिहारच्या जनतेने काँग्रेसला बाहेरचा रस्ता दाखवला आहे. २०२९ मध्ये काँग्रेस सर्वात छोटा पक्ष असेल.

## आरटीओ अधिकारी विजय चव्हाणांसह
# पाच जणांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

परिवहन खात्यातील आरटीओ पदावरील पदोन्नती आणि पदस्थापनेत स्पर्धक असलेल्या रवींद्र भुयार यांच्यावर कट रचून खोट्या गुन्ह्यात अडकवणाऱ्या नागपूर ग्रामीणचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण आणि इतर सहा जणांवर नागपूरातील सिताबर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

आरटीओ अधिकारी रवींद्र भुयार हे नागपूर शहर आरटीओ कार्यालयात कार्यरत होते. त्यांना हटवण्यासाठी काही अधिकाऱ्यांनी एकत्र येत कट रचला. त्यानुसार भुयार यांच्या विरोधात एका महिला अधिकाऱ्यास चुकीची माहिती देऊन भुयार यांच्या विरोधात अ‍ॅट्रॉसिटी व विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल करण्यास सांगण्यात आले.

नागपूरच्या पदस्थापनेला विरोध नको म्हणून भुयारांना अडचणीत आणण्यासाठी विजय चव्हाण यांनी सेवानिवृत्त अधिकारी लक्ष्मण खाडे याची मदत घेऊन आरटीओ नागपूरचा अतिरिक्त कार्यभार मिळवला होता. दुसरीकडे परिवहन विभागात अधिकाऱ्यांच्या बदल्या संदर्भात गैरकारभाराची चौकशी पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी विशेष एसआयटीद्वारे केली. त्यात लक्ष्मण खाडे, विजय चव्हाण व इतर अधिकाऱ्यांच्या समावेशाबाबत शासनास पुरावे सादर झाले.

दरम्यान रविंद्र भुयार यांचा काटा काढण्यासाठी व त्यांना नागपूर येथे पदस्थापना मिळू नये म्हणून विजय चव्हाण, लक्ष्मण खाडे यांनी एका महिला अधिकाऱ्यास गैरसमज निर्माण होईल अशी चुकीची बातमी देऊन रविंद्र भुयार यांच्या विरोधात खोटा गुन्हा दाखल करायला प्रवृत्त केले. या प्रकरणी पोलीसांना हा गुन्हा खोटा असल्याचे आढळले. त्यामुळे न्यायालयात ब- वर्ग समरी दाखल झाल्याने न्यायालयाने पोलीसांचा अहवाल अंतिम केला.

तर जानेवारी २०२३ मध्ये महिला अधिकाऱ्याने केलेल्या तक्रारीची चौकशी करण्याकरिता आरटीओ अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. हिमांगीनी पाटील या चव्हाण यांच्या बॅचमेट होत्या. त्यामुळे पाटील यांनी विजय चव्हाणांना लाभ व्हावा म्हणून समितीमधील दीपक पाटील यांच्यासोबत खोटा रिपोर्ट तयार केला. हा सर्व गैरप्रकार समितीमधील अशासकीय सदस्या अनिता दार्वेकर यांनी उघडकीस आणल्यामुळे समितीचे बेकायदेशीर वर्तन समोर आले.

या संदर्भात न्यायालयात दाखल विविध प्रकरणात पारित झालेल्या आदेशाप्रमाणे रवींद्र भुयार यांच्या फिर्यादीवरून व सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे विजय चव्हाण, दीपक पाटील, लक्ष्मण खाडे, हेमांगीनी पाटील आणखी एक अशा पाच जणांवर दखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीसांनी आमच्यावर तक्रार वा गुन्हा दाखल केल्याबाबत माहिती नाही. मध्यंतरी एकाने परिवहन आयुक्त व एका अधिकाऱ्याविरोधात न्यायालयात अवमानना याचिका दाखल केली होती. त्यांच्याकडून या पद्धतीची तक्रार झाल्याचे नकारता येत नाही. त्यांनी शासनाच्या समितीलाही खोटे ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही कोणतेही गैरप्रकार केला नसून वेळ आल्यास आमची बाजू मांडू, अशी माहिती नागपूर ग्रामीणचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी दिली.

## काँग्रेस नेते नितीन राऊत समर्थक
# माजी नगरसेवक भाजपमध्ये



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर उत्तर नागपूरच्या राजकारणात मोठी उलथापालथ होत आहे. काँग्रेसचे माजी मंत्री डॉक्टर नितीन राऊत यांचे समर्थक मिलिंद सोनटक्के यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपूरचे असूनही गेल्या तीन विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपला उत्तर नागपूरमध्ये आघाडी घेता आलेली नाही. या मतदारसंघात भाजपला नेहमीच तुलनेने कमी मतदान मिळाले आहे.

भाजपने येथे विविध प्रकल्पांच्या माध्यमातून, तसेच मतविभाजन घडवून आणण्यासाठी अनेक उमेदवार मैदानात उतरवून, पूर्ण ताकद लावूनही निर्णायक मताधिक्य मिळवता आलेले नाही.

याच पार्श्वभूमीवर, आता महापालिका निवडणुका जवळ येत असताना काँग्रेसचे कार्यकर्ते आपल्या पक्षात सामावून काँग्रेसला कमकुवत करण्याचे प्रयत्न भाजपने सुरू केले आहेत. वॉर्ड क्रमांक १ मधील मातेश्वरी भवन येथे आयोजित भाजप प्रवेश सोहळ्यात सोनटक्के यांनी अधिकृतपणे भाजपची सदस्यता घेतली. त्यांच्या सोबत पत्नी मधुरी सोनटक्के तसेच काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. हा काँग्रेस नेते नितीन राऊत यांना धक्का मानला जातो.

या कार्यक्रमाचे आयोजन वॉर्ड अध्यक्ष खेलेन्द्र बिठले यांनी केले होते. सोहळ्यात भाजप व्यापारी आघाडीचे प्रदेश अध्यक्ष वीरेंद्र कुकरेजा, उत्तर नागपूरचे माजी आमदार डॉ. मिलिंद माने, माजी झोन अध्यक्ष प्रमिला मातरणी, भाजप नारी मंडळ अध्यक्ष संजय चौधरी, माजी नगरसेविका सुषमा चौधरी, वॉर्ड अध्यक्ष जगदीश वंजानी, तसेच आकाश जठाले यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. मिलिंद सोनटक्के यांनी काँग्रेसच्या तिकिटावर नागपूर महापालिकेची तीन वेळा निवडणूक लढवली दोन वेळा पराभूत झाले. भाजपमध्ये प्रवेश करताना सोनटक्के म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासकार्यासोबत काम करण्याची इच्छा असल्याने मी आणि माझे सहकारी भाजपमध्ये प्रवेश करत आहोत. त्यांच्या या निर्णयामुळे भाजपला उत्तर नागपूरातील संघटनात्मक शक्ती वाढण्यास मदत होणार आहे. राजकीय जाणकारांच्या मते, उत्तर नागपूरमध्ये आगामी निवडणुकीत हा प्रवेश काँग्रेससाठी मोठा धक्का ठरू शकतो.

# अभयारण्यांच्या परिसरात खाणकामास बंदी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्यांपासून एक किमी परिसरात खाणकाम करण्यास बंदी घालण्याचा निर्णय गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने घेतला. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.

संरक्षित क्षेत्राच्या एक किलोमीटर परिसरात खाणकाम हे वन्यजीवांसाठी धोकादायक आहे. गोवा फाऊंडेशन प्रकरणातील निर्देश हे फक्त गोव्यासाठी होते, पण आता ते सर्व राज्यांना लागू व्हावेत, असे या आदेशात नमूद करण्यात आले. झारखंडमधील सरंडा क्षेत्रास वन्यजीव अभयारण्य म्हणून अधिसूचित करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. तसेच त्या भागातील आदिवासींचे हक्क वनाधिकार कायद्यानुसार संरक्षित राहतील असेही स्पष्ट करण्यात आले. भागातील शाळा, रेल्वेमार्ग, दवाखाने यांना संरक्षण देण्यात येईल. मात्र, त्या भागात कोणत्याही प्रकारचे खाणकाम करण्यात येणार नाही असे नमूद केले.

या निर्णयानंतर राज्य सरकारांना आता त्यांच्या हद्दीतील राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्यांना आजूबाजूचा एक किलोमीटरचा परिसर नो मायनिंग झोन म्हणून जाहीर करावा लागेल.

## आता तरी इव्हीएमवर रडणे सोडा
# नवनीत राणा यांचा टोला

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १४ :



बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी एनडीएला बहुमत मिळताना दिसत आहे. त्यावर भाजप आणि विरोधी पक्षांकडूनही प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसत आहेत. त्यातच भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी बिहारच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बिहारच्या जनतेने नाकारल्याबद्दल चांगलाच टोला लगावला आहे. नवनीत राणा म्हणाल्या, बिहारच्या लोकांनी एनडीएच्या बाजूने त्सुनामीसारखा निकाल दिला आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेचे, परिश्रमाचे हे फळ आहे. देश प्रेमाचे हे द्योतक आहे. बिहारच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आजच्या युगातील चाणक्य अमित शहा यांच्यावर दृढ विश्वास व्यक्त केला आहे.

पण, याचवेळी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाने या निकालापासून आता तरी धडा घ्यायला हवा. केवळ ईव्हीएमवर बोलून चालणार नाही. प्रत्यक्ष मैदानावर लोकांसाठी त्यांना काम करावे लागणार आहे.

ईव्हीएमच्या नावावर मोर्चे काढणे आता तरी थांबवा, माझा काँग्रेसच्या नेत्यांना आणि शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांना सल्ला आहे, की आता तरी सुधारा. ईव्हीएमवर रडणे बंद करा. आता तरी त्यांनी ईव्हीएमचा ड्रामा बंद केला पाहिजे. केवळ आरोप करून चालणार नाही. लोकांना कोण आपले आहेत आणि कोण परके आहेत, हे चांगले कळते, असा टोला त्यांनी लगावला. युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी देखील उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे. उद्धव ठाकरे हे काँग्रेसच्या विचारांवर चालत आहेत.

# व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य शिखर अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी, पंढरपूर, दि. १४ :

जगातील तब्बल ४ लाख ७० हजार पत्रकार सदस्यसंख्या असलेली आणि क्रमांक १ मानली जाणारी आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना व्हॉईस ऑफ मीडिया यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य शिखर पत्रकार अधिवेशनाचा भव्य सोहळा येत्या १५ व १६ नोव्हेंबर २०२५ रोजी इस्कॉन पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. पत्रकारिता, समाजकारण आणि अध्यात्म यांचा संगम घडवणारे, हे अधिवेशन देशभरातील पत्रकार, संपादक, विचारवंत, प्रशासनातील अधिकारी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीने सोहळ्याचे रूप धारण करणार आहे. उद्घाटन समारंभास राज्यपाल हरीभाऊ बागडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून इस्कॉनचे जगविख्यात कीर्तनकार प. पु. लोकनाथ स्वामी महाराज यांची अध्यात्मिक उपस्थिती या अधिवेशनाला भाविकतेचा आणि प्रेरणेचा नवा आयाम देणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनाचा प्रारंभ भक्ती आणि देशभक्ती या संकल्पनेवर आधारित गायक, गीतकार व संगीतकार अतुल दिवे आणि त्यांच्या टीमच्या विशेष कार्यक्रमाने होणार आहे. व्हॉईस ऑफ मीडियाचा झेंडा खांद्यावर घेऊन पुढे जाणाऱ्या पत्रकारांच्या भावना व्यक्त करणारे विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले असून, या अधिवेशनात चला पत्रकार आणि पत्रकारितेसाठी उभारू लढा या विषयावर व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक आणि आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के मार्गदर्शन करणार आहेत.

उद्घाटन समारंभात गृह ग्रामीण, गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार आणि खनिकर्म मंत्री मा. पंकज भोयर, जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आ. सचिन कल्याण शेट्टी भूषवणार असून इस्कॉन पंढरपूर प्रकल्प प्रमुख प. पु. प्रल्हाद दास, सांगली जिल्हाधिकारी अशोक काकडे, पुणे विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप भाजीभाकरे आणि आयुष्मान भारत मुंबईचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात पत्रकारितेतील दीर्घ आणि अमूल्य योगदानाबद्दल व्हॉईस ऑफ मीडिया जीवनगौरव पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आले असून हा पुरस्कार राज्यपाल हरीभाऊ बागडे, माजी मंत्री व ज्येष्ठ नेत्या मा. यशोमती ठाकूर आणि इस्कॉनचे कीर्तनाचार्य प. पु. लोकनाथ स्वामी महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे मानकरी म्हणून ज्येष्ठ संपादक श्रीकृष्ण चांडक, उत्तम कांबळे, विजय बाविस्कर, मृणालिनी नानिवडेकर, रवींद्र अंबेकर आणि विशाल पाटील यांची निवड करण्यात आली आहे. तसेच भक्तीचा अखंड वारसा जगभर नेणारे प. पु. लोकनाथ स्वामी महाराज यांना व्हॉईस ऑफ मीडिया भूवैकुंठ सेवा - आंतरराष्ट्रीय गौरव पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

# २३९ किलो गांजा जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
गडचिरोली, दि. १४ :

जिल्ह्यात मागील काही वर्षापासून सुरू असलेल्या गांजा तस्करीवर गडचिरोली पोलिसांनी आजपर्यंतची सर्वात मोठी कारवाई करत तब्बल सव्वा कोटी रुपयांचा गांजा जप्त केला आहे. गडचिरोली पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने कुरखेडा उपविभागातील मालेवाडा पोलीस मदत केंद्राच्या हद्दीतील हुर्‍यालदंड येथे ही धडक कारवाई केली. यावेळी प्रमुख आरोपी कृष्णा हरसिंग बोगा (वय ४१, रा. हुर्‍यालदंड, ता. कुरखेडा) याला अटक करण्यात आली आहे.

कुरखेडा तालुक्यातील हुर्‍यालदंड येथे राहणारा कृष्णा बोगा हा त्याच्या घराजवळील सांदवाडीमध्ये मोठ्या प्रमाणावर गांजाची लागवड करत असून, तो हा माल लवकरच विक्री करण्याच्या तयारीत आहे. अशी गोपनीय माहिती पोलीस अधिकाऱ्यांना मिळाली होती. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे एक विशेष पथक तातडीने हुर्‍यालदंड गावाकडे रवाना करण्यात आले. गावात पोहोचल्यानंतर, पोलीस पथकाने सर्व कायदेशीर प्रक्रियांचे पालन करत आणि स्थानिक पंचांना सोबत घेऊन आरोपी कृष्णा बोगा याच्या घराची झडती घेण्यास सुरुवात केली असता त्यांना घरामागे असलेल्या सांदवाडीतील दृश्य बघून पोलिसही चक्रावले.

# ताडोबाहून सह्याद्रीत तारा
## राज्यातील सर्वात मोठी व्याघ्र पुर्नस्थापना मोहीम सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



महाराष्ट्रातील व्याघ्र संवर्धनाला नवी चालना देण्यासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि पेंच व्याघ्र प्रकल्पातील आठ वाघांचे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात स्थानांतरण करण्यास पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. तीन नर आणि पाच मादी वाघांच्या या नियोजित स्थलांतर प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणून ताडोबातील एक तरुण वाघीण सुरक्षितरीत्या सह्याद्रीत पोहोचवण्यात आली आहे. ऑपरेशन तारा या राज्यव्यापी व्याघ्र संवर्धन मोहिमेअंतर्गत झालेल्या या प्रक्रियेला भारतीय वन्यजीव संस्थेचे वैज्ञानिक मार्गदर्शन लाभले आहे. महाराष्ट्रातील व्याघ्र संख्यावाढ आणि नवीन अधिवास विकसित करण्याच्या दृष्टीने हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

सुमारे तीन वर्षांची ही वाघीण T२०-S-२ म्हणून ओळखली जाते. ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील खडसांगी परिक्षेत्रातून ती NTCA ने ठरवलेल्या सर्व सुरक्षाविषयक नियमांचे पालन करून पकडण्यात आली. पकडल्यानंतर तिला प्राथमिक उपचार देण्यात आले आणि प्रकृती स्थिर ठेवल्यानंतर विशेष तयार करण्यात आलेल्या वन्यजीव वाहतूक वाहनातून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात हलवण्यात आले. ही संपूर्ण कारवाई अत्यंत दक्षतेने आणि प्रशिक्षित पथकाच्या उपस्थितीत करण्यात आली. स्थलांतरादरम्यान वाघिणीच्या आरोग्यावर सतत नजर ठेवण्यात आली होती आणि ताडोबातील वन्यजीव पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. आर.एस. खोब्रागडे यांनी संपूर्ण आरोग्य तपासणीची जबाबदारी सांभाळली.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात पोहोचल्यावर वाघीणीला सोनारळी येथील विशेष एनक्लोजरमध्ये सॉफ्ट रिलीज पद्धतीने सोडण्यात आले आहे. या पद्धतीअंतर्गत वन्य प्राण्याला मुक्त जंगलात सोडण्यापूर्वी काही काळ नियंत्रित वातावरणात ठेवून त्याला नवीन अधिवासाशी जुळवून घेतले जाते. पुढील काही आठवड्यांत तिच्या हालचाली, आहार, वर्तन आणि आरोग्याचा तपशीलवार अभ्यास केला जाणार आहे. सर्व निरीक्षणे पूर्ण झाल्यानंतरच तिला सह्याद्रीच्या मूळ जंगलात खुल्या अधिवासात सोडले जाईल. अशा प्रकारचे वैज्ञानिक पुनर्स्थापन जंगलातील जैवविविधता टिकविण्यासाठी आणि व्याघ्रांचे स्वतंत्र प्रदेश निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्वाचे ठरते. ऑपरेशन तारा, हे महाराष्ट्रातील व्याघ्र संवर्धनासाठी एक दीर्घकालीन आणि समन्वित प्रयत्न आहे. ताडोबा आणि पेंच व्याघ्र प्रकल्पांमध्ये गेल्या काही वर्षांत वाघांची संख्या स्थिरपणे वाढत आहे, तर सह्याद्रीत वाघांचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

### सक्षम, सुरक्षित आणि नैसर्गिक व्याघ्र अधिवास बनविण्यासाठी कटिबद्ध - तुषार चव्हाण

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक तुषार चव्हाण यांनी या यशस्वी स्थलांतराबद्दल समाधान व्यक्त केले. ते म्हणाले की, ऑपरेशन तारा हा सह्याद्रीसाठी ऐतिहासिक टप्पा आहे. सॉफ्ट रिलीजद्वारे वैज्ञानिक पुनर्स्थापना प्रक्रिया प्रभावीपणे सुरू झाली आहे. आमचे पथक या संपूर्ण प्रक्रियेकडे अत्यंत जबाबदारीने पाहत आहे. हक्क च्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण निरीक्षण सुरू ठेवले जाईल.











